# श्री साईलीला




एप्रिल, मे, जून १९५३

३०-६-५३

किरकोळ अंक किं. १० आणे

# अखिल भारतीय साईभक्त संमेलन

श्री. श्रीपाद बा. देव, संयुक्त चिटणीस, अखिल भारतीय साईभक्त संमेलन, यांचें पत्र उशीरां हातीं आल्यामुळें जागेच्या अभावीं पत्रांतील मुख्य मजकूर खालीं देत आहों.

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापक समितीच्या आश्रयाखाली, प्रमुख साईभक्तांची सभा पूर्वसूचनेनें शिरडी येथें रविवार दि. २४–५–१९५३ रोजी घेण्यांत आली. सभेस सुमारें ४३ साईभक्त हजर होते. श्री. देव यांच्या प्राथमिक भाषणानें कामास सुरवात होऊन त्या दिवसाकरितां श्री. वसंतराव ना. गोरक्षकर यांना अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. बऱ्याच भक्तांची भाषणें होऊन, संमेलनाच्या तारखा दि. २०, २१ व २२ नव्हेंबर १९५३ ठरविण्यांत आल्या. संमेलन शिरडी येथें होईल. स्वागत व कार्यकारी मंडळें अशी दोन मंडळें निवडण्यांत आलीं. स्वागत मंडळाचे अध्यक्ष श्री. बाजीराव पाटील ( शिरडी ) असून संमेलनाचें अध्यक्षपद मद्रासचे एकनिष्ठ साईभक्त श्री. बी. व्ही. नृसिंहस्वामी यांना दिलें आहे. श्री. पी. के. सावंत, बी. ए. एल्. एल्. बी., एम्. एल्. ए.—अध्यक्ष, श्री. वसंतराव गोरक्षकर—उपाध्यक्ष, श्री. श्री. बा. देव व श्री. बा. स. पाताडे—सं. चिटणीस, श्री. त्रिवेदी ( मॅनेजर, जोधपूर क. बँक, ठाणें )—खजिनदार, २ ऑडीटर्स आणि १८ सदस्य मिळून २५ जणांचें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें.

वरील संमेलनासाठी स्वागत मंडळाचे सदस्य व प्रतिनिधि मिळविण्याचें काम जोरांत सुरू होईल; तरी सर्व साईभक्तांनीं संमेलनाच्या कार्याला हातभार लावावा अशी विनंती.

संमेलनासंबंधीं पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा—

श्री. श्री. बा. देव, बी ए. एलएल्. बी., ॲडव्होकेट
रेशनिंग ऑफीसशेजारीं,
५० नेताजी सुभाष पथ, ठाणें

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेनें चालविलेलें

# श्री साई लीला त्रैमासिक

संपादक

श्री. नागेश आत्माराम सावंत

व्यवस्थापक

श्री. रामचंद्र महादेव राणे

साहाय्यक मंडळ

श्री. वसंतराव नारायण गोरक्षकर

प्रो. गोपाळ वामन भागवत, एम्. ए.

श्री. बाळकृष्ण सखाराम पाताडे

श्री. कृष्णराव जयराम भट

वार्षिक वर्गणी
रु. २-४-० (ट. ख. स.)

किरकोळ अंक
दहा आणे

# अनुक्रमणिका


| अ. नं. | विषय | लेखकांचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | प्रिय वाचक | संपादक | । |
| २ | श्री गुरुपौर्णिमेचा उत्सव | जिज्ञासु | । |
| ३ | बाबांची लीला | आमचे प्रतिनिधि | १ |
| ४ | रसनेंद्रिय प्रथम जिंका | रा. कृ. कामत | १ |
| ५ | परमभक्तीचें गुलाबी कोडें | खं. स त्रिलोकेकर | १ |
| ६ | माझ्या जीवींचा जिव्हाळा | डॉ. के. भ. गव्हाणकर | ३ |
| ७ | ज्ञानभक्ति | ना. वा. गुणाजी | ३ |
| ८ | वाचकांचे विचार | ग. वि. गोखले | ४ |
| ९ | संतांचिया गांवीं | म. द. जोशी | ४ |
| १० | शिरडी-वृत्त | | ५ |


## श्रीसाईलीला मासिकासंबंधी

* श्रीसाईलीला त्रैमासिकाचे अंक दर वर्षी मार्च, जून, सप्टेंबर व डिसेंबर
महिन्यांत प्रसिद्ध होतात.
* किरकोळ अंकास दहा आणे.
* वार्षिक वर्गणी ट. ख. सह रु. २-४-०
* वर्षारंभ जानेवारीपासून असला तरी वर्गणीदार कोणत्याही महिन्यापासून होतां ये
* मागणी केल्यास वर्षारंभापासूनचे अंक शिल्लक असल्यास पाठविले जातात.
* वर्गणी मनिऑर्डरनें 'संपादक, श्रीसाईलीला त्रैमासिक कार्यालय, २५ बँक स्ट्री
फोर्ट, मुंबई १' या पत्त्यावर पाठवावी.
* या मासिकांत प्रामुख्यानें धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाचेच विषय येतात.
* आलेले लेख प्रसिद्ध करणें अगर न करणें व त्यांत जरूर तो फेरबदल करणें याबद्द
सर्व हक्क संपादकांकडे आहेत.

—संपाद

# अखिल भारतीय साईभक्त संमेलन

श्री. श्रीपाद बा. देव, संयुक्त चिटणीस, अखिल भारतीय साईभक्त संमेलन, यांचें पत्र उशीरां हातीं आल्यामुळें जागेच्या अभावीं पत्रांतील मुख्य मजकूर खालीं देत आहों.

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापक समितीच्या आश्रयाखाली, प्रमुख साईभक्तांची सभा पूर्वसूचनेनें शिरडी येथें रविवार दि. २४–५–१९५२ रोजीं घेण्यांत आली. सभेस सुमारें ४३ साईभक्त हजर होते. श्री. देव यांच्या प्रायमिक भाषणानें कामास सुरवात होऊन त्या दिवसाकरितां श्री. वसंतराव ना. गोरक्षकर यांना अध्यक्ष म्हणून निवडण्यांत आलें. बऱ्याच भक्तांचीं भाषणें होऊन, संमेलनाच्या तारखा दि. २०, २१ व २२ नव्हेंबर १९५२ ठरविण्यांत आल्या, संमेलन शिरडी येथें होईल. स्वागत व कार्यकारी मंडळ अशीं दोन मंडळें निवडण्यांत आलीं. स्वागत मंडळाचे अध्यक्ष श्री. बाजीराव पाटील ( शिरडी ) असून संमेलनाचें अध्यक्षपद मद्रासचे एकनिष्ठ साईभक्त श्री. बी. व्ही. नृसिंहस्वामी यांना दिलें आहे. श्री. पी. के. सावंत, बी. ए. एल्. एल्. बी., एम्. एल्. ए.–अध्यक्ष, श्री. वसंतराव गोरक्षकर–उपाध्यक्ष, श्री. श्री. बा. देव व श्री. बा. स. पाताडे–सं. चिटणीस, श्री. त्रिवेदी ( मॅनेजर, जोधपूर क. बँक, ठाणें )–खजिनदार, २ ऑडीटर्स आणि १८ सदस्य मिळून २५ जणांचें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें.

वरील संमेलनासाठीं स्वागत मंडळाचे सदस्य व प्रतिनिधि मिळविण्याचें काम जोरांत सुरू होईल; तरी सर्व साईभक्तांनीं संमेलनाच्या कार्याला हातभार लावावा अशी विनंती.

संमेलनासंबंधी पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा—

श्री. श्री. बा. देव, बी. ए. एलएल्. बी., ॲडव्होकेट
रेशनिंग ऑफीसशेजारीं,
५० नेताजी सुभाष पथ, ठाणें

# श्री साई लीला



॥ श्रीसाईनाथ समर्थ ॥

करितां माझिया कथांचें श्रवण । तयांचें कीर्तन आणि चिंतन ।
होईल मद्भक्तीचें जनन । अविद्या निरसन रोकडें ॥ २ ॥ ८२ ॥
शिवाय जे साई-कीर्ति गाती । तैसेच जे जे सद्भावें परिसती ।
उभयही साई स्वरूप होती । हें दृढ चित्तीं जाणावें ॥ ४४ ॥ १८२ ॥

(श्रीसाई सच्चरित)

## प्रिय वाचक—

जूनचा हा अंक वेळेवर वाचकांच्या हातीं देतांना मला आनंद होतो. मार्चच्या रामनवमी विशेषांकाचें मराठी वाचकांनीं आणि साईभक्तांनीं मोठ्या उत्साहानें स्वागत केलें. अंकाची प्रत पेळ्यासारखी खपली. वर्गणीदारांची संख्याहि हळूहळू पण नित्य नेमानें वाढत आहे. भक्ति, धर्म, नीति, तत्त्वज्ञान या विषयांवर व्यासंगी व अधिकारी व्यक्तींचे लेख मिळवून ते साईलीलेंत देण्याचा आमचा प्रयत्न निरलसपणें चालू आहे. या प्रयत्नाला कितपत यश येत आहे याची थोडीशी साक्ष चालू अंकावरूनहि वाचकांना पटेल.

× × ×

गेल्या अंकीं 'भक्ति' या विषयावर विद्वद्रत्न डॉ. रा. प्र. पारनेरकर यांचा लेख आम्हीं दिला होता. या लेखांत व्यक्त झालेले विचार कित्येक वाचकांना अत्यंत ओंबले असें दिसतें. 'ज्याला भक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें

आणि अभेदाचें वेड बाळगून चालणार नाहीं' हा डॉ. पारनेरकर यांनी काढलेला निष्कर्ष अनेकांना बिलकूल मान्य नाहीं. यासंबंधीं तीव्र आक्षेप घेणारीं अनेक पत्रें आमच्याकडे आलीं आहेत. त्यांतील एका पत्राचा सारांश नमुन्यादाखल 'वाचकांचे विचार' या सदराखालीं इतरत्र दिला आहे. डॉ. पारनेरकरांचा लेख अंकांत देतांना संपादकांनीं कांहींहि टीप वा खुलासा न दिल्यामुळें वाचकांचा गैरसमज होतो असें या पत्रलेखकाचें म्हणणें आहे.

या ठिकाणीं एक गोष्ट मला स्पष्ट करावीशी वाटते ती ही कीं, श्रीसाईलीलेंत येणाऱ्या सर्वच लेखांतील विचार मला सर्वथा मान्य असतात असें नाहीं. प्रत्येक लेखांत व्यक्त झालेल्या मतांना व विचारांना प्रत्येक लेखक व्यक्तिशः जबाबदार आहे. श्रीसाई लीलेंत समाविष्ट करण्यापूर्वी एकच कसोटी प्रत्येक लेखाला लावली जाते. कोणताहि लेख 'साई-भक्तीला' बाध आणणारा, बाबांचा अवमान करणारा, बाबांच्याबद्दल भक्तांना असणाऱ्या प्रेमादराचे बाबतींत भक्तांचें अंतःकरण दुखविणारा आहे कीं काय ? ही ती कसोटी होय. या कसोटीवर पारखून तो लेख निर्दोष ठरला म्हणजे, त्यांतील विचार संपादकास पटत नाहींत या कारणावरून कांहीं तो त्याज्य ठरविला जात नाहीं. अशा लेखांत उलट सुलट बाजूंचे विचार फक्त एकदोन वेळां प्रसिद्ध करून विषय संपविण्यांत येईल

विचार पटोत वा न पटोत वाचकाच्या अंतःकरणांत खळबळ माजविणें, त्याला पुन्हा पुन्हा विचार करायला लावणें आणि विचाराचें वादळ संपल्यावर निर्माण होणाऱ्या निर्मळ वातावरणांत त्याला कार्यप्रवृत्त करणें हें अशा लेख-वैशिष्ट्य असावें. या वैशिष्ट्याच्या दृष्टीनें डॉ. पारनेरकर यांचा लेख संपूर्णतः यशस्वी झाला आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. या अंकीं डॉ. पारनेरकरांच्या लेखाला मुद्देसूद उत्तर देणारा श्री. ना. वा. गुणाजी यांचा लेख देत आहोंत. त्याकडे आम्ही वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों.

× × ×

शिरडीहून 'शंकर' नांवाच्या एका भक्तानें एक उद्बोधक वाटणारें पत्र आलें आहे. पत्र मूळ इंग्रजींत आहे. त्या पत्रांत हा भक्त लिहितो :—

'बाबांची कृपा संपादन करण्याचा विशिष्ट मार्गानें स्वतः अनुभव घेऊन तो मार्ग इतर जिज्ञासूंनाहि सांगत असतों. इतर अनेक लोकांनीं या उपासना-मार्गाचा अवलंब करून बाबांच्या कृपाप्रसादाची प्राप्ति करून घेतली आहे. पण ज्यांना मी अनुभवसिद्ध उपासना सांगतों त्यांना त्या उपासनेचा नेहमींच समाधानकारक अनुभव येत नाहीं असें अनेकदां आढळून येतें. ईश्वरी नेमावर मात करूनहि प्रसंगीं सच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईबाबा आपल्या भक्तांच्या हांकेला धांवून येतात ही वस्तुस्थिति असें असून कांहीं भक्त आर्तचित्तानें बाबांची आळवणी करीत असतांहि आपल्या प्रारब्धानुसार दुःख भोगीत असलेले आढळतात. हें असें कां असावें ? दुष्ट ग्रहांची शांति केल्यानें प्रारब्धांतील ग्रहबाधा टळते

तें अवश्य करावें. परंतु एखाद्या विभूतीबद्दलचा एखाद्या मोठ्या माणसाच्याहि मनांत असलेला दुराग्रह सर्वथा काढून टाकणें हें अशक्यप्राय असतें. अशा स्थितींत त्याचें समाधान करण्याच्या भरीला पडून स्वतःचें मन कां विचलित होऊं द्यावें ? भगवान् श्रीकृष्ण हे पूर्णावतार होते. तरीहि शिशुपालानें भरसभेंत त्यांची कमी निर्भर्त्सना केली काय ? श्रीरामकृष्ण परमहंसांचें सबंध जीवनचरित्र त्यांच्या निकट सहवासांत राहून पाहाणाऱ्या आणि एका काळीं त्यांची असीम निष्ठेनें सेवा करणाऱ्या त्यांच्या—भाच्यानें—हृदयनें—अखेरीस त्यांच्याविषयींच्या आपल्या अधिक्षेप—वृत्तीनें स्वतःचेंच अकल्याण करून घेतलें नाहीं काय ? अवतारी पुरुषांना यथार्थपणें ओळखण्यास ओळखणाऱ्याच्या अंगीं तितका अधिकार असावा लागतो अथवा भक्ति असावी लागते. हीं नसतील तर अवतारी पुरुषाची ओळख पटणें अशक्यप्रायच असतें. ज्यांना आपण परमदैवत मानतों त्यांचा कोणाकडून अधिक्षेप होत असल्यास अत्यंत दुःख होणें हें स्वाभाविकच आहे. परंतु तरीहि त्या टीकाकाराविषयीं आपल्या मनांत दुर्विकल्प न ठेवतां त्याच्याविषयीं सकरुण आणि उदासीन वृत्ति ठेवावी हेंच माझ्या मतें योग्य ठरेल. येवल्याच्या साईभक्तांनीं पाठविलेल्या पत्रांत त्यांनीं श्रीजतींच्या उद्‌गारांबद्दल खेद व्यक्त केला असला तरी श्रीजतींविषयीं अत्यंत आदरानेंच त्यांनीं लिहिलें आहे, हें खरोखरच अभिनंदनीय आहे.

श्री साईबाबांवर होणाऱ्या टीकेसंबंधीं आपला दृष्टिकोण कसा असावा, या प्रश्नावर मला असें वाटतें कीं—(१) जिथें अज्ञानानें टीका झालेली दिसते तिथें तें अज्ञान नाहींसें करण्याचा यत्न करावा; (२) जिथें दूषित पूर्वग्रहानें टीका होते तिथें तो ग्रह काढून टाकण्याचा साधार प्रयत्न करावा; पण (३) जिथें केवळ अकारणविद्वेषानें टीका होते तिथें उपेक्षावृत्ति धारण करावी. अंतीं श्री साईबाबांवरील टीकेचा निरास हा आपल्या दुबळ्या प्रयत्नांनीं होणार नसून बाबांची जशी इच्छा असेल त्याप्रमाणेंच होणार आहे, ही भक्तांनीं खूणगांठ बांधून ठेवावी.

× × ×

श्रीसाईबाबा हे जन्मानें कोण होते यासंबंधीं बराच वाद अलीकडे माजलेला आहे. साईलीलेच्या गेल्या अंकांत श्री. नागेश वासुदेव गुणाजी यांचा एक लेख प्रसिद्ध झालेला असून त्यांनीं ‘ विंधित—कान आणि सुंता—अभाव या दोन मुख्य गोष्टींवरून बाबा हिंदु ब्राह्मण होते असें ठरतें ’ असा अभिप्राय व्यक्त केला आहे. मद्रासमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या साईसुधा या नियतकालिकांत, बाबांची सुंता झाली होती हें दाखविणारीं कांहीं प्रमाणें उद्धृत केलीं आहेत. तसेंच ‘ साईबाबा हे १८५८ सालीं एका गुजराती ब्राह्मण कुटुंबांत जन्मास आले, त्यांना एका फकिरांची गांठ पडली, तो त्यांना मक्केच्या यात्रेला घेऊन गेला होता ’ इ. इ. हकीकतींनीं भरलेलें राजर्षि बालसंन्यासी यांचें एक ‘ साईचरित्रहि ’ साईसुधेंत आलेलें होतें. त्याविषयीं शिर्डी संस्थाननें केलेला पत्रव्यवहार इतरत्र दिला आहे. तो वाचकांना मनोरंजक वाटेल; साईबाबांच्या चरित्रांतील या असल्या घटना शोधून काढणें हें इतिहाससंशोधकांनीं वाटल्यास करावें. श्रीसाईबाबा हे हिंदु होते कीं मुसलमान, ब्राह्मण कीं शूद्र, असल्यासारख्या प्रश्नांचा कोणताहि निकाल लागला तरी

साईबाबांच्या अंगभूत श्रेष्ठत्वाला अधिक उजाळा मिळणार नाहीं किंवा काळिमा येणार नाहीं; तें श्रेष्ठत्व अखंड आजच्यासारखेंच उज्ज्वल राहील.

ज्यांना साईबाबांची कृपा संपादन करून घ्यायची आहे, त्यांची उपदेशवाणी अंत-रंगांत सांठवून घ्यायची आहे आणि आपल्या जीविताचें सार्थक करून घ्यायचें आहे त्यांनीं असल्या वादांपासून दोन हात दूर रहावें हेंच उत्तम. खुद्द साईबाबांनीं आपली जन्मकथा कधीं कुणाला सांगितली नाहीं. ' माया ही माता आणि ब्रह्म हा पिता ' हीच साईबाबांची यथार्थ जन्मकथा. इतक्या विशाल चरित्राच्या या विभूतीला कोणता तरी धर्म, कोणती तरी जात ही देऊन त्यांच्या सर्वव्यापी जीवनाला संकुचित चौकटींत बसविण्याचा अट्टा-हास करणाऱ्या लोकांकडे पाहून मला हंसू येतें, आणि कींवहि वाटते. हंसूं अशासाठीं येतें कीं, सुईच्या नेढ्यांतून हत्ती नेणें हें जितकें अशक्य तितकेंच जाति–धर्म–पंथ–निरपेक्ष अशा साईबाबांना कुठल्या तरी संकुचित मर्यादेंत कोंडणें हें अशक्य आहे हें या लोकांच्या लक्षांत कसें येत नाहीं ? कींव अशासाठीं वाटते कीं, साईबाबांसारखा कल्पवृक्ष लाभलेला असतांना त्याच्या छायेंत आपला जन्मोजन्मींचा संसारताप नाहीसा करून घ्यायचा सोडून, हे लोक तर्कांच्या रखरखीत उन्हांत उभे राहतात आणि कल्पवृक्षाच्या फांद्या किती व त्याला पानें किती याची निष्फळ चर्चा करीत बसतात ! साईभक्तांनीं असले वाद फार तर


## आपण सारे भाऊ भाऊ—

श्री बाबांचे ठिकाणीं भेदभाव नाहीं. उच्च–नीच, वरिष्ठ–कनिष्ठ हीं भावनाहि नाहीं. सर्वांचा दर्जा एक. जणुं सारे भाऊ भाऊच !

अशींच गोष्ट आमच्या टोपीचीहि आहे. कोणीहि उच्च--नीच, वरिष्ठ–कनिष्ठ आपल्या आवडीची सुबक ' टोपी ' वापरून स्वत:च्या ठिकाणची एकीची भावना जागृत ठेवूं शकतो.

अशा सुंदर–सुबक–टिकाऊ

# टोप्या

मिळण्याचें आदर्श ठिकाण—

## भाऊ मोरोबा ढगे

ठाकुरद्वार रोड, मुंबई २

हुरून गंमतीनें पहावें; त्यांत स्वतः पडूं नये. बाबांचें अगम्य चरित्र त्यांच्या ह्य कोणाला उलगडलें नाहीं. आतां ते गेल्याला पस्तीसएक वर्षे होऊन गेल्यावर त्य जीवनाचा थांगपत्ता लावण्यास समर्थ असा मायेचा पूत कोणी असेल हें सर्वथा भवनीय आहे. आणि ही माहिती हवी तरी कशाला? भांडणें निर्माण करायला? बाबांची पूजा हिंदूप्रमाणेंच अहिंदू करतो, ब्राह्मणाप्रमाणेंच अब्राह्मण करतो, सर्वजण त्यांच्याकडे हा आपला म्हणून पाहतात. वस्तुतः जातीयतावाद संपूर्णपणें ना झाल्याचें एकमेव आदर्श उदाहरण कुठें पाहावें असेल तर तें बाबांच्या चरित्रांत. संग्राहक ईश्वरभक्तीचें अजोड उदाहरण असें लाभलेलें असतांना बाबांना एखाद्या वि जातींत कोंबण्याची कां ही अघोरी खटपट? लोखंडाला सोनें बनविणारा परिस मिळ असतांना, तो परीस नसून चटणी वाटण्याचा पाटा आहे असें ठरविण्याची ही वास कसली द्योतक म्हणावी? छे छे! बाबांच्या नामजपांत व त्यांच्या गुणगानांत नि होऊन भक्तिरसांत डुंबण्याचें सोडून हें तुषकंडन कोणीं करावें!

× × ×

इहामुत्रीं जो बाणला विरक्ती। विवेक वैराग्य जयाची संपत्ति।
काय तयाची पहाणें जाती। परमार्थ प्राप्ति धिक् तयाची॥ ८३॥
धर्माधर्मातीत स्थिति। जयाची शुद्ध आनंद वृत्ति।
काय तयाची पहाणें जाती। परमार्थ प्राप्ति धिक् तयाची॥ ९४॥

साईसचरित, अ. ३८

× × ×

श्रीसाईलीला हें त्रैमासिक मासिक या स्वरूपांत काढण्याचा आमचा मनोदय पू साईलीलेंतून जाहीर झालेलाच आहे. तें केव्हां घडून येईल हें कसें सांग श्रीसाईबाबांची इच्छा असेल तर तें यंदांच घडेल. त्यांची इच्छा नसल्यास आमचा भ प्रयत्नहि विफलच ठरेल. पण बाबांची इच्छा होती परंतु आमचा उदंड प्रयत्न न असा अपवाद येऊं न देण्याची मात्र आम्ही कळकळीनें शिकस्त करूं असें मी निश्चि आश्वासन देतों. माझ्यावर पडलेलें हें काम बाबांचें सदैव स्मरण करीत मी यथा अधिकांत अधिक उत्कृष्ट बजावण्याचा प्रयत्न करीन. अखेरीस बाबांना आणि बा वृंदांना माझी प्रार्थना एवढीच कीं,

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।
करुनि घेयावें हें तुमतें। विनवित असें॥

ॐ श्रीसाईसमर्थ

—संपादक




संकलक—आमचे प्रतिनिधी

## १ भूत बाधा नाहींशी झाली

**श्री.** बाबासाहेब सखाराम बाबळे हे कोपरगांव तालुक्यांतील सुरेगांवचे राहणारे असून यांचें सुमारें सहा महिन्यांपूर्वींच लग्न झालें. परंतु लग्नानंतर अवघ्या २ महिन्यांत यांचें कुटुंब सौ. सुशिलाबाई ह्या आजारी पडल्या. त्या वारंवार बेशुद्ध पडत व त्या अवस्थेंत असतांना घट्ट दांत मिटवून घेत. त्यामुळें त्यांच्या प्रकृती-विषयीं घरांतील मंडळीस चिंता वाटूं लागली. बरेच औषधोपचार केले पण गुण नाहीं. डॉक्टरांनीं आजारीपणाचें निदान हिस्टेरिया केलें. पण त्यावर पुष्कळ पैसे खर्च करून व सर्व प्रकारचे डॉक्टरी इलाज करूनही कांहींच गुण येईना. आजूबाजूचे लोक कांहीं भूतबाधा असावी अशी शंका प्रदर्शित करूं लागले. पण नवरा-बायको दोघेंही सुशिक्षित असल्यामुळें त्यांचा भुताखेतावर विश्वासच नव्हता. परंतु दुखणें वाढतच चाललें व सौ. सुशिलाबाई यांची तब्येत दिवसेंदिवस जास्त खराब होत चालली. त्या आतां १८।१८ तास बेशुद्धावस्थेंत असत. शेवटीं ऑक्टोबर महिन्याच्या (१९५२) २३ व २४ तारखेस त्यांची तब्येत फारच गंभीर झाली तेव्हां, वडिलांचे सांगण्यावरून व दुसरा कांहीं इलाजच उरला नव्हता म्हणून श्री. बाबळे यांनीं आपलें कुटुंबास शिर्डीस श्रीसाईनाथांचे दर्शनास ता. २५-१०-५२ रोजीं आणलें. बरोबर त्यांच्या आत्याबाई होत्या. ता. २५ व ता. २६ रोजीं सुशिलाबाईंस श्रीसाईनाथांच्या समाधीचे दर्शनास आरतीचे वेळेस बळजबरीनेंच धरून नेण्यांत आलें. कारण त्या जवळ जवळ सारा दिवस बेशुद्धावस्थेंतच असत. आरती झाल्यानंतर त्यांना बळजबरीनें धरूनच समाधीस प्रदक्षणा घालण्यास लावीत व नंतर तीर्थ व विभूतीही बळजबरीनेंच पाजण्यांत येई. थोडीशी विभूति अंगासही लावीत

ता. २६ रोजीं संध्याकाळची आरती संपतांच सौ. सुशिलाबाई ह्या एकाएकीं खालीं पडल्या. त्यावेळेस तेथें मुंबईचे श्री. बाळकृष्ण यशवंत प्रधान या नांवाचे एक भक्त होते. त्यांच्या सूचनेवरून बाईवर बाबांचें तीर्थ व उदी सारखी शिंपडण्यांत आली आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्या बेशुद्धावस्थेंतच सुशिलाबाई थोड्याच वेळांत बोलूं लागल्या. तेव्हां श्री. प्रधान यांनीं कांहीं प्रश्न विचारले. कारण त्यांची खात्री



श्रीसाईंबाबा ( शिरडी )

झाली कीं, सौ. सुशिलाबाईस भुतानें पछाडलें आहे व तें भूत आतां बोलूं लागलें आहे. हा वेळपावेंतों समाधि-मंदिरांत हें दृश्य पाहण्यास बरेच लोक जमले होते. सुशिलाबाईंनीं जीं उत्तरें दिलीं तीं अर्थातच तुटक होतीं व त्यांत सुसंगतपणा नव्हता. परंतु वाचकांचे सोईकरतां त्यांत सुसंगतपणा आणून ते प्रश्न व जीं उत्तरें दिलीं तीं उत्तरें खालीं देत आहे.

प्रश्न—'तूं कोण आहेस, कोठून आलीस व या झाडाला कशाला धरलेंस ?'

उत्तर—'मी गडावरची असून जातीची भिल्लीण आहे. हें झाड माहेराहून सासरीं येतांना संध्याकाळचे वेळेस वेळापूर स्टँडजवळ एक मोठा वृक्ष आहे तेथें उभें होतें मीं या झाडाला विचारलें कीं, तूं येथें कां आलीस ? नंतर मीं तिला झपाटलें.

प्रश्न—मग आतां जातेस कीं नाहीं ?

उत्तर—जातें-जातें.

प्रश्न— साईबाबांची शपथ घेऊन सांग कीं, मी परत येणार नाहीं.

उत्तर—मी परत येणार नाहीं.

त्यावर श्री. प्रधान यांचे सांगण्यावरून बावळे व त्यांच्या आत्याबाई यांनीं सुशिला-बाईंस धरून त्यांना बाबांच्या समाधीजवळ नेलें व समाधीच्या पायरीवर त्यांचें डोकें टेवलें. नंतर श्री. बावळे व श्री. प्रधान यांनीं सुशिलाबाईंचे अंगावर सारखा बाबांच्या उदीचा मारा केला. थोड्याच वेळांत वेशुद्धावस्थेंतच सुशिलाबाई म्हणाल्या कीं, साईनाथ मला मारतात, मी जातें, जातें. असें त्रिवार बोलून त्या मागच्या मागें धाडकन् खालीं पडल्या. तेव्हां श्री. प्रधान यांची खात्री झाली कीं भूत निघून गेलें. म्हणून त्यांनीं बावळे यांस सांगितलें कीं तुम्ही कोणीही बाईंस न शिवतां त्यांना एकट्याच समाधीला निदान एक तरी प्रदक्षणा घालण्यास लावा म्हणजे कांहीं भीति नाहीं. त्याप्रमाणें श्री. बावळे यांनीं आपले कुटुंबांस सांगतांच त्यांनीं एकट्यानेंच हळूहळूं समाधीस एक प्रदक्षणा घातली.

त्यानंतर सुशिलाबाईंचें आजारीपण संपलेंच. त्या पुन्हां कधीं बेशुद्ध पडल्या नाहींत व आतां त्या घरांतलीं रोजचीं कामें इतरांसारखींच करतात. श्री. बावळे आपले कुटुंबासह नुकतेच श्रीसाईनाथांचें दर्शन घेण्यास पुन्हां शिर्डीस आले होते. त्या वेळेस ते मजजवळ म्हणाले, 'खरोखर केवळ श्रीसाईनाथांच्या कृपेमुळेंच आमचा संसार आतां पुन्हां पूर्ववत सुरळीत चालला आहे व त्यांच्यामुळेंच आतां आम्ही पूर्ण सुखी आहोंत.'

★

## २ साईबाबा नवसाला पावले

श्री. दत्तोबा विष्णू वाणी हे बारामतीचे राहणारे असून (जिल्हा पुणें) धंदा मोटार-ड्रायव्हरचा आहे. वालचंदनगर शुगर फॅक्टरींत त्यांना नोकरी होती. परंतु स्वतंत्र धंदा करण्याची इच्छा म्हणून त्यांनीं नोकरीचा राजीनामा दिला. ता. १५ ऑगस्ट रोजींच स्वतंत्र धंद्यास सुरवात करावी अशी त्यांची फार इच्छा होती. परंतु ऑगस्ट

परंतु ह्या निमित्तानें मला श्रीसाईबाबांची अगदीं खरीखुरी माहिती मिळाली हें माझें मोठेंच भाग्य होय. कारण त्या 'संतांच्या' सहवासांत असतांना मला जी बाबांची माहिती मिळाली ती अत्यंत विकृत स्वरूपांत. परंतु मुंबईस मात्र बाबांच्या लीलेची, त्यांच्या उपदेशाची व त्यांना आपल्या भक्तांबद्दल वाटणाऱ्या कळवळ्याची सर्व खरीखुरी हकीकत कळली आणि त्यांचेवर माझी श्रद्धा बसली. मी त्यांची अनन्यभावानें कांहीं काळ भक्ति करूं लागतांच साईगुरुचरणानंदसरस्वती या नांवाच्या एका मद्राशी साईभक्ताची गांठ पडली. त्यानें मला मोठा धीर देऊन साईनामाचा एक मंत्र दिला. तो मंत्र मी अत्यंत मनोभावें एकसारखा जपूं लागलों, त्याचप्रमाणें साईस्तवनमंजिरी रोज वाचूं लागलों आणि श्रीसाईसच्चरित्र ग्रंथाचे सप्ताहही करूं लागलों. ३|४ महिन्यांनंतर घरामध्यें तंबाखूचा वास येऊं लागला. हा वास कोठून येतो व कां येतो तें समजेना. मी स्वतः तंबाखू खात नाहीं किंवा ओढीतही नाहीं. बरें हा वास मी बाबांचें ध्यान करीत असतांनाच येत असे, इतर वेळेस नाहीं. तेव्हां हें मला एक मोठें आश्चर्यच वाटूं लागलें. ह्या वेळपावेतों माझा साईनामाचा अंदाजें १॥ कोटि जप झाला होता. पुढें श्री. नाडकर्णी या नांवाच्या एका साईभक्ताची गांठ पडली व त्यांना मीं हें सर्व सांगतांच ते म्हणाले, 'तुझ्या घरांत बाबांचें अस्तित्व असल्याची ही खूण आहे. बाबा चिलीम पीत असत त्यामुळें हा वास तुझ्या घरांत, तूं बाबांचा जप करीत असतांना येतो, असे अनुभव पुष्कळांना आलेले आहेत.' हें ऐकून अर्थातच मला आनंद झाला, व जास्त तन्मयतेनें मी साईनामाचा जप जपूं लागलों. स्तवनमंजरी वाचणें व जमेल तेव्हां श्रीसाईसच्चरित्र ग्रंथाचें पारायण करणें सुरूच होतें. कांहीं दिवसांनीं उदबत्तीचा व नंतर अत्तराचा आणि चंदनाचा असे वास, मी ध्यान करीत असतांना घरांत येऊं लागले, या कालांत माझ्या प्रापंचिक अडचणीहि दूर होऊं लागल्या. कसें कांय तें समजत नाहीं, पण साईबाबा प्रत्येक अडचण वेळोंवेळीं दूर करतात. ही बाबांची फार मोठी कृपा होय. नाहींतर आज माझी काय दशा झाली असती याची कल्पनाच करवत नाहीं.

ता. ११-११-५२ रोजीं शिर्डीस मी प्रथमच आलों. बरेच दिवसापासून शिर्डीस जावें असें वाटे, पण पैशाच्या अभावीं गप्प बसावें लागे. येथें येण्याचे पूर्वी ७|८ दिवस अगोदर मात्र माझ्या इच्छेनें फारच उचल खाल्ली. शिर्डीस लवकर जाण्याचा योग जमून येत नाहीं याचें मला त्या दिवशीं फारच वाईट वाटलें. आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्याच दिवशीं माझ्या एका मित्रानें माझ्याकडून ५|६ वर्षांपूर्वी उसनवार म्हणून घेतलेली रक्कम सर्वच्या सर्व कांहीं कल्पना नसतांना, अचानक परत केली. ही रक्कम मीं बुडीत म्हणूनच समजली होती. पण बाबांची लीला अगाध आहे. ही रक्कम मिळतांच माझी प्रवास-खर्चाची अडचण दूर झाली. व अशा रीतीनें बाबांच्या समाधीचें व त्यांच्या इतर स्थानांचें दर्शन घेण्याची फारा दिवसांची माझी इच्छा पूर्ण झाली. माझ्या बाकीच्याही चिंता श्रीबाबाच दूर करतील याची मला पूर्ण खात्री आहे व त्यांचेवरच आतां माझ्या संकटांचा सर्व भार आहे.

# ( २ ) बाबांच्या प्रतिमेंत रमणमहर्षींचें दर्शन

श्रीमती सुशिलादेवी मत्कल, 'बालभुवन', ११ वा रस्ता, खार, ( मुंबई ) यांचा अनुभव:—

आमचे गुरु रमणमहर्षि होत. त्यांचे दर्शनास आम्हीं बरेच वेळां गेलों होतों. त्यांच्या पादुकांची पूजा आमचे घरीं नित्य होत असते. परंतु सुमारें ३ वर्षांपूर्वी ज्या वेळेस् त्यांनीं समाधि घेतली त्या वेळेस आम्हीं स्वित्झर्लंडमध्यें होतों. त्यांचा देह ३ दिवस-पर्यंत भक्तांचे दर्शनार्थ तसाच ठेवला होता परंतु परदेशांत असल्यामुळें आम्हांस कांहीं त्यांचें दर्शन घेण्याचा योग आला नाहीं. त्यामुळें मला फार वाईट वाटलें. मीं निश्चय केला कीं त्यांच्या समाधीचें दर्शन घेतल्यावरच इतर देवांच्या दर्शनास व यात्रेस जाऊं. परंतु आमच्या गुरूंची इच्छा निराळीच होती.

सुमारें १५ दिवसांपूर्वी मद्रासकडील दोन गृहस्थ आमचेकडे आले. मद्रास-मध्यें साईबाबांचें एक मंदिर बांधीत आहेत व त्याकरतां देणगी गोळा करण्याकरतां म्हणून ते प्रांतोप्रांतीं हिंडत होते. त्यांनीं साईबाबांची बरीच माहिती आम्हांस दिली व सांगितलें कीं तुम्हीं शिर्डीस जाऊन त्यांच्या समाधीचें दर्शन घेऊन या. त्यावर मीं त्यांना म्हटलें कीं, आमचे गुरु रमणमहर्षी आहेत. व त्यांच्या समाधीचें प्रथम दर्शन घेतल्याशिवाय आम्हांस कोणत्याहि देवस्थानाचे दर्शनास अथवा यात्रेस जावयाचें नाहीं. तेव्हां ते म्हणाले, 'साईबाबा तरी काय निराळे आहेत ? सर्व सद्गुरु एकच. रमणमहर्षि व साईबाबा एकच होत ! आम्हीं जास्त काय बोलायें ? तुम्ही शिर्डीस जा, तुम्हांला प्रचीती येईलच.'

आणि काय कशी प्रेरणा झाली तें माहित नाहीं, पण दोनच दिवसांनीं मी शिर्डीस जाण्याकरितां निघालें. कामामुळें महाराजांना मात्र येतां आलें नाहीं. मुंबईहून निघालें, व तारीख ३–३–५३ रोजीं येथें आलें. गुरुपादुकेजवळील शंकराच्या पिंडीमागें जो बाबांचा फोटो आहे त्या फोटोचें दर्शन होतांचं मला रमणमहर्षींनाच प्रत्यक्ष पाहि-ल्याचा भास झाला. मलाच नव्हे, तर माझ्याबरोबर आमच्या ओळखीच्या श्रीमती डोंगरे या होत्या, त्यांनाही तसेंच वाटलें व त्यांनीं तें मजजवळ बोलूनही दाखविलें. तेव्हां मला या चमत्काराचें अर्थातच आश्चर्य वाटलें व आनंदही झाला. आज ७/८ दिवस मी येथें आहें व श्रीसाईसच्चरित्र ग्रंथाचें पारायण करीत आहे. परंतु एवढ्या कालांत मला एकदांहि असें वाटलें नाहीं कीं आपण रमणमहर्षींच्या समाधीचें प्रथम दर्शन न घेतां येथें येण्यांत चूक केली. कारण येथें रमणमहर्षींचा प्रत्यक्ष वास आहे याची जाणीव मला सारखी होत असते. यावरून खऱ्या संतांचे ठिकाणीं भेदभाव नाहीं, ते सर्व एकच होत, हेंच खरें !

× × ×

# [ ३ ] बाबांनीं भक्ताला दिलेलें दिव्यस्वरूप दर्शन

श्री. वीरेंद्र पी. पांड्या, बिझिनेस कॉन्ट्रॅक्टर, वैतरणा कल्याण (मुंबई) यांचा श्रीसाईप्रभावाबद्दलचा अनुभव, श्रीसाईलीला त्रैमासिकाच्या डिसेंबर १९५२ च्या अंकांत आला आहे. अनुभव इंग्लिशमध्यें आहे. 'नास्तिकांनाही तूं लाविसी निजभजनीं" असें जें श्रीसाईबाबांच्या आरतींत म्हटलें आहे तें सर्वस्वीं कसें खरें आहे याचा तो अनुभव म्हणजे एक उत्कृष्ट नमुना आहे. तसेंच 'विरोधी भक्ति' म्हणजे काय प्रकार असतो हेंहि त्या अनुभवावरून कळून येईल.

श्रीसाईबाबांनीं त्यांच्या सर्व इच्छा पुऱ्या केल्यामुळें व अशा रीतीनें त्यांना स्वतःलाच श्रीसाईप्रभावाचा प्रत्यक्ष अनुभव आल्यामुळें त्यांनीं कबूल केल्याप्रमाणें आपल्या कामांची जबाबदारी आपल्या भावावर सोंपविली व ते स्वतः शिर्डीस श्रीसाईबाबांच्या दर्शनास ता. १३–८–१९५२ रोजीं आले. श्रीसाईबाबांबद्दलच्या सर्व शंकाकुशंका आतां मावळल्या होत्या व ते त्यांचे (साईबाबांचे) एक निष्ठावान् भक्त बनले होते. श्रींच्या चरणाजवळ कांहीं काळ राहावें, त्यांची कांहीं तरी प्रत्यक्ष सेवा करावी व त्यांचे आशीर्वाद घेऊन मग येथून जावें या उद्देशानें ते येथें बराच काळ राहिले. अशी सेवा करीत असतांना ता. २१–८–५२ रोजीं त्यांना जो अनुभव आला तो खालीं देत आहे. श्री. पांड्या म्हणालेः—

'ता. २१–८–५२ रोजीं समाधिमंदिरांत संध्याकाळची आरती चालू असतां एकाएकीं डोळ्यावर झांपड आल्यासारखें होऊन माझे डोळे मिटले गेले, आणि मी श्रीसाईबाबांना दगडावर बसल्याचें पाहिलें. समाधिमंदिरांत बाबांचा जो फोटो आहे तशाच सारखे बाबा मला दिसत होते. थोड्याच वेळांत बाबांनीं आपल्या डाव्या पायावरून उजवा हात उचलला व तो बराच वर नेऊन व हात लांब करून हाताची बोटें ताठ केलीं. लगेंच एक प्रकारचें तेजोवलय त्या हाताच्या तळव्याभोंवतीं दिसूं लागलें. परंतु हा एक केवळ भास आहे कीं ही घटना प्रत्यक्षांत खरी घडत आहे हें जाणून घेण्यासाठीं माझें अंतर्मन धडपडूं लागलें आणि त्या धडपडीमुळें माझे डोळे तत्काळ उघडले गेले. आणि अर्थातच हा सर्व भास आहे याची मला जाणीव झाली. मीं पुन्हां आरती म्हणण्यांत निमग्न झालों.

'परंतु घडलेल्या घटनेचें मला सारखें आश्चर्य वाटूं लागलें. भास कां होईना, पण असेंच दृश्य कां दिसावें याचा उलगडा होईना. तेव्हां मनावर ताबा ठेवून पुन्हां एकदां डोळे मिटावे व असेंच दृश्य दिसतें कां पहावें असा विचार करून मीं पुन्हां एकदां डोळे मिटले. आणि काय आश्चर्य! पूर्वीचेंच दृश्य तात्काळतीव्र डोळ्यासमोर दिसूं लागलें. साईबाबा तसेच दगडावर बसलेले व उजवा हात वर केलेला व हाताचा तळवा खाली व बोटें ताठ व सरळ, असें दृश्य पुन्हां एकदां दिसलें. तसेंच त्या हाताभोंवती पूर्वीप्रमाणें एक तेजोवलयहि दिसलें. परंतु थोड्याच वेळांत त्या तेजोवलयांत हाताभोंवतीं एक ह असलेला दिसूं लागला. नंतर साईबाबांच्या त्या हाताच्या तळव्यांतून राम, कृष्ण

दत्तात्रेय व हनूमान या देवांच्या मूर्ती निघाल्या आणि हाताभोंवतीं फिरूं लागल्या. थोड्याच वेळांत माझे डोळे उघडले व पाहतों तों आरती संपलेली दिसली. नंतर मीहि समाधीस नमस्कार करून जरा बाजूस उभा राहिलों.

'परंतु मासमय कां होईना जी घटना मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिली तिचा अर्थ माझ्या लक्षांत येईना. कोणास यांचा अर्थ विचारावा तेंहि समजेना. परंतु थोड्याच वेळांत एक साईभक्त बाबांच्या समाधीचें दर्शन अत्यंत भक्तिभावानें घेत असलेले माझ्या नजरेस आले. त्यांना मीं या घटनेचा अर्थ विचारतांच ते म्हणाले कीं या घटनेचा अर्थ दोन प्रकारचा आहे. आपला हात वर उंचावून व तो लांब करून आणि हाताचा तळवा खालीं करून व बोटें ताठ करून साईबाबांनीं तुम्हांस सूचित केलें कीं त्यांचा तुम्हांस पूर्ण आशीर्वाद आहे. आणि त्यांचे हातांतून राम, कृष्ण, दत्तात्रेय व हनूमान हीं जीं दैवतें बाहेर पडलीं त्यावरून त्यांनीं तुम्हांस असें सुचविलें कीं आपण (साईबाबा) प्रत्यक्ष देवच आहोंत, मग मला तुम्हीं राम, कृष्ण, दत्तात्रेय, हनूमान अथवा इतर कोणत्याही देवताच्या नांवानें संबोधा.

'हा खुलासा ऐकतांच माझ्या मनाचें समाधान झालें व श्रीसाईबाबांनीं आपणांस आशीर्वाद देऊन आपणांस जवळ केलें याबद्दल अत्यंत आनंद वाटला.'

× × ×

## [४] आजारी मुलाला आराम पडला

श्री. वसंत दिगंबर कवठकर, राहणार–विजय महाल, तुळशीबाग, एस्. एम्. लेन, माटुंगा (मुंबई नं. १६) यांचा अनुभव—

'माझा मुलगा अनिल (वय ५ वर्षें) हा गेले वर्षभर टयुबरक्युलर मेनिन्जायटीसनें आजारी आहे. डॉक्टरी इलाज केले, पण गुण आला नाहीं. बाबांची माहिती होती परंतु यांचा फोटो माझ्या घरांत नव्हता. त्यांचा फोटो घरांत ठेवावा अशी प्रेरणा किंवा इच्छा आजपर्यंत झालीच नाहीं. परंतु सुमारें दोन महिन्यांपूर्वी मात्र बाबांचा फोटो आपले घरांत असावा असें वाटूं लागलें. म्हणून एक दिवस बाबांचा फोटो आणावा असा उद्देश करूनच मुलासह बाजारांत गेलों. परंतु कसें काय विसरलों कोण जाणे, सबंध बाजार ...ला तरी कांहीं बाबांचा फोटो आणणें जमलें नाहीं. आतां घेऊं, मग घेऊं, पुढच्या दुकानांत घेऊं, असें करत करत फोटो घेण्याचें विसरूनच गेलों. आणि ती गोष्ट माझे स्मरणांतून नाहींशी झाली. परंतु त्याचे रात्रीं ११ चे सुमारास माझ्या मुलास एक मोठा जुलाब झाला. त्याबरोबर माझें मन अस्वस्थ झालें. कारण मुलास मीं बाजारांत नेलें होतें. त्याच्या खाण्यांत कांहीं कमजास्त आलें काय, त्यास बाहेरची हवा बाधली कीं काय वगैरे नानाप्रकारें काळजी वाटूं लागली. नंतर अर्ध्या अर्ध्या तासाचे अंतरानें त्यास आणखी दोन मोठे जुलाब झाले. तिसऱ्या जुलाबाचे वेळेस मात्र मी फारच घाबरून गेलों. कारण मुलगा टयुबरक्युलर मेनिन्जायटीससारख्या रोगानें आजारी. अशा रोगांत जुलाब होणें म्हणजे मृत्यूशींच गांठ. म्हणून तिसऱ्या

झुलाबाचे वेळेस मात्र मी फार घाबरलों. रात्रीं १२-१२। चा सुमार! काय करावें समजेना. इतक्यांत एकाएकीं बाबांचा फोटो आज आणण्याचें आपण विसरून गेलो ही गोष्ट माझ्या लक्षांत आली व त्याचाच तर हा परिणाम नसेल ना, असें वाटूं लागलें विचार करतां असें वाटूं लागलें कीं बाबांनीं ही एक प्रकारची आपणांस सूचना दिली आहे व त्यांचा फोटो घरांत आणण्यास आतां कोणत्याही प्रकारची हयगय करतां कामा नये. म्हणून मीं बाबांस प्रार्थना केली कीं, 'झालेल्या चुकीची माफी करा, उद्यां तुमचा फोटो जरूर जरूर आणीन. मुलास तावडतोब बरें वाटूं द्यां. आम्ही सर्व तुमचे दर्शनास येऊं.' आणि काय आश्चर्य! मीं प्रार्थना केल्यावर अवघ्या १०।१५ मिनिटांतच मुलगा झोंपी गेला व दुसरे दिवशीं सकाळीं ८ वाजतां हंसत खेळत उठला आणि रोजच्या सारखा शौचास गेला. जणुं कांहीं आदल्या रात्रीं त्यास झुलाब झालेच नव्हते! आम्हांस आश्चर्य वाटलें व ही सर्व बाबांची लीला होय व आमच्या चुकीचें प्रायश्चित्त देण्याकरतां म्हणून त्यांनीं हा सर्व खेळ केला याची खात्री पटली. पण त्याच बरोबर बाबांचें आपणांकडे लक्ष आहे याची जाणीव मला झाली व मला फार आनंद वाटला. दुसरे दिवशीं मीं तावडतोब हयगय न करतां बाबांचा फोटो घरांत आणला व त्याची आम्हीं आतां अत्यंत भक्तिपूर्वक पूजाअर्चा वगैरे करतों. त्या दिवसापासून मुलाच्या प्रकृतींतही सुधारणा घडत चालली व डॉक्टरी औषधाचा गुणही दिसूं लागला. नंतर बोलल्याप्रमाणें आम्हीं सर्वजण अनिलसह बाबांचे दर्शनास शिर्डीस ता. १२-३-५३ रोजीं आलों.'

× × ×

## [५] बाबांच्या कृपेनें धंद्यांत बरकत

श्री. प्रल्हाद तानीराम वाणी, धंदा-उदबत्ती कारखानदार, राहणार-घ. नं. ६८ मारुतीपेठ, रथाजवळ, जळगांव. (पू. खा.) यांचा अनुभव—

'५।६ वर्षांपासून कामानिमित्त फिरतीवर असतों. सुमारें दीड एक वर्षापूर्वी मी असाच एकदां धुळ्यास गेलों. तेथें आमच्या एका एजंटाकडे गेलों असतां तो आणि त्याच्या घरांतील मंडळी एका फोटोची पूजा करण्यांत गर्क झालेले दिसून आले. फकिरासारखा वेष धारण केलेल्या एका साधूचा तो फोटो होता. पूजा संपल्यावर मीं त्या त्या साधूची माहिती विचारतांच त्यानें सांगितलें कीं हे साधु म्हणजे शिर्डीचे प्रसिद्ध साईबाबा होत. त्यांनीं श्रीबाबांबद्दलची बरीचशी आणखी माहिती सांगितली आणि ते म्हणाले, 'बाबा अडचणींत सांपडलेल्यांना मदत करतात. ते देहरूप असतां लोकांना भीक मागून (अन्नाची) स्वतःची क्षुधा निवारण करीत. त्यांनीं कधींहि चैन केली नाही. ते लोकांना पैशाची मदत करीत. खिशांत पैसा नसतांनासुद्धां हात घालतांच त्यांच्या खिशांत पैसा येई व तो सर्व पैसा ते लोकांना वांटीत.' ही माहिती ऐकतांच मला बाबांच्याबद्दल आदर उत्पन्न झाला आणि मी नव्या दृष्टीनें त्या फोटोकडे पाहूं लागलो. माझ्या मनाला समाधान वाटलें व बाबांवर माझी श्रद्धा बसली.

'धुळ्यास मी ४।५ दिवस होतों, पण मालाचा खप कांहीं म्हणण्यासारखा झाला

झाला

व्हता. परंतु आतां मला बाबांची माहिति कळली होती व तेच आतां माझी काळजी वाहतील असें मला विश्वासपूर्वक वाटूं लागलें. मीं त्याच दिवशीं बाबांजवळ प्रार्थना. केली व त्यांना विनविलें कीं माझ्या धंद्यांत वाढ करा. आश्चर्याची गोष्ट अशी कीं दुसरेच दिवशीं व्यापारांत फरक पडून वाढ झाली. अर्थात्च मला आनंद झाला व त्या भरांत मीं शिर्डीस बाबांच्या दर्शनास जाण्याचा निश्चय केला. तो योग मे १९५२ मध्यें आला. त्यानंतर मीं २।३ वेळेस शिर्डीस येऊन बाबांचें दर्शन घेऊन गेलों. बाबांच्या कृपेनें माझा धंदा उत्तम चालला आहे.

× × ×

## [ ६ ] बाबांनीं न्याय दिला

**श्री.** लक्ष्मण गणपत जाधव, पेन्शनर पोलिस हवालदार ( राहणार-आनकाईची आंबेवाडी, तालुका येवला, जिल्हा नाशिक ) यांचा अनुभवः—

'गेल्या वर्षांतील गोष्ट. मीं घर बांधलें. परंतु घराशेजारच्या बाईनीं माझ्यावर जागेबाबत अतिक्रमण केल्याबद्दल खटला भरला. मीं अतिक्रमण केलें नव्हतें, परंतु त्या गांवांत मी नवीन असल्यामुळें मला खटल्याच्या निकालाबद्दल शंका वाटूं लागली. कारण माझ्या बाजूचें कोणीच नव्हतें. माझा एक विश्वास फक्त साईबाबावरच. त्यांनीं आतांपर्यंत माझीं २।३ संकटें नाहींशीं केलीं होतीं. परंतु माणसाचें मन मोठें चमत्कारिक असतें, एवढे अनुभव येऊनसुद्धां मनास धाकधुकच वाटत होती. शेवटीं बाबांचें नांव घेऊन एका वकिलाकडे गेलों व त्यास वकिलपत्र दिलें. बाहेर आल्यावर कोर्टाचे बाजूकडे चालूं लागलों. अंतःकरणांत मात्र बाबांचा धांवा सारखा करीत होतों. ७।८ पावलें जातों न जातों तोंच मला बाबांची प्रतिमा असलेलें एक चांदीचें लॉकेट दिसलें. बाबांची प्रतिमा वरच्या बाजूस असून त्यांचें तोंड माझ्याकडे होतें. मीं ताबडतोब तें लॉकेट उचलून घेतलें. आणि त्याच वेळेस माझी खात्री झाली कीं, बाबा याही खटल्यांत मला यश देतील. मग मात्र मी निर्धास्त झालों. पुढें २।४ तारखा होऊन बाईतर्फे साक्षीही झाल्या, परंतु बाबांच्या कृपेनें निकाल मात्र माझ्याच बाजूनें झाला; इतकेंच नव्हे तर त्या बाईस वर अपील करण्यास कोर्टानें जागाच ठेवली नाहीं.

× × ×

## [ ७ ] उदीच्या प्रभावानें क्षयरोग गेला

**श्री.** नरनजी कसनजी देसाई ( एन्. के. देसाई ), रिटायर्ड हेड इंजिनियर, आरे मिल्क कॉलनी, मुंबई ( राहाण्याचा पत्ता-'स्वाश्रय', पालीराम रोड, अंधेरी ) यांना गेल्या वर्षापर्यंत ( सन १९५२ ) साईबाबांची माहिती नव्हती. एके दिवशीं सहज बंगलोरचे स्वामी रामदास यांची 'दर्शन' नांवाची भजनमाला त्यांच्या वाचण्यांत आली. त्या भजनमालेंत साईबाबांचा थोडासा उल्लेख आला होता. 'बाबांबद्दलची' तीच त्यांना पहिली माहिती. ती माहिती वाचतांच शिर्डीस जाण्याची त्यांना फार उत्सुकता

वांढू लागली. व मग पूर्ण माहिती मिळवून ते थोड्याच दिवसांत शिर्डीस बाबांच्या द
नास आले. दर्शन घेऊन परत जातांना समाधि-मंदिरांतील उदी त्यांनी बरोबर. घेत
मुंबईस कांहीं दिवस राहून ते बलसाडला आपल्या घरीं गेले. बरोबर उदी होती
त्यांच्या घराशेजारींच चार घरें टाकून सौ. इंदुबेन चंद्रकांत देसाई या नांवाची एक
राहात होती. गेलें १॥ वर्ष ती क्षयानें आजारी होती. डॉक्टरी औषधोपचार चालूच हो
परंतु ती बाई सुधारत नव्हती. १०२° पर्यंत ताप असे व अंथरुणावर पडून असे. इंजेक्श
चालू होतीं. औषधापायीं पुष्कळ पैसा तिच्या नवऱ्यानें खर्च केला आणि औषधें व इंजेक्श
घेऊन घेऊन ती बाईही थकून गेली होती व जीविताला कंटाळून गेली होती. त्या बा
भेटण्यास म्हणून श्री. देसाई (नरनजी कसनजी) गेले असतां तिची स्थिती पाहून त्यां
म्हटलें, 'तुम्हीं तर सर्व औषधें घेतलींच आहेत आणि अजून घेतच आहांत. त्यांच
-पासून कांहीं म्हणण्यासारखा गुण येत नाहीं हेंहि स्पष्ट दिसतच आहे. तर तुम्ही आ
सर्वस्वीं देवावर भार टाका आणि मीं ही जी साईबाबांची उदी शिर्डीहून आणली
ती तुम्ही बाबांचें नांव घेऊन अत्यंत श्रद्धेनें रोज तीन वेळेस खात जा आणि' थोडी
आंगासही लावा. बाबा नक्कीच तुम्हांस लवकरच बरें करतील. बाबांवर निष्ठा ठेवा
धीर धरा.'

बाबांची लीला अशी कीं अवघ्या ८ दिवसांतच त्या बाईचा ताप गेला व
हिंडूं-फिरूं लागली. पुढील ८ दिवसांत ती साधारण अर्धा-पाऊण मैल चालूही लाग
आणि पुढल्या आठ दिवसांत ती घरांतलीं थोडीबहुत कामेंही करूं लागली. पुढें
एक दिवसांनीं तिच्या सासरीं मुंज व लग्न अशीं दोन कार्यें निघालीं. तिच्या सा
बायां माणसांत ती मुख्य होती व त्यामुळें या कार्यांत तिच्यावर जरा जबाबदारीचें
पडलें. परंतु तेंहि तिनें व्यवस्थित पार पाडलें. एवढी दगदग पडूनही तिची प्र
बिघडली नाहीं ही मोठी आश्चर्याचीच गोष्ट होय. नंतर थोड्याच दिवसांत बाबांचे
तिला दिवस राहिले. ती अगदीं सुखरूप बाळंत झाली व तिला मुलगी झाली. कि
म्हणजे मुलीचा जन्म गुरुवारींच झाला. मार्च ५३ च्या सुरवातीस ती मुले
साईबाबांचे दर्शनास शिर्डीस येऊन गेली.

× × ×

## [ ८ ] तऱ्हेवाईक गिऱ्हाईक

श्री. ए. आर. सावंत (धंदा-कापड दुकान) ३६३, मंगळदास मार्केटसमोर,
मुंबई नं. २, यांनीं, ते नुकतेच शिर्डीस आले असतांना खालील अनुभव सांगित

'तीन वर्षांपासून मला बाबांची माहिती आहे. त्यांचा फोटो माझ्या दुकानां
घरींहि लावलेला आहे. दुकानांत फोटो लावण्यापूर्वी धंद्यासंबंधीं एकप्रकारची
काळजी वाटत असे. धंद्यानिमित्त व इतर कामाकरतां बाहेरगांवीं जाण्याचा व
प्रसंग येतो. त्या वेळेस नेहमीं असें वाटे कीं, आपल्या पश्चात् दुकानांतील नोकर प्रामा
पणें वागतील किंवा नाहीं, मी ते कांही अफरातफर करतील ! या आणि अशाच

नानाविध काळजींनीं मन नेहमीं व्यांत असे. परंतु बाबांचा फोटो लावल्यापासून या सर्व काळज्या दूर झाल्या. धंद्यांत एकप्रकारचा आत्मविश्वास वाढूं लागला.

'एके दिवशीं आमच्या दुकानांत एक पारशी गृहस्थ आला. त्यानें कापड खरेदी केलें. कापडाचें बिल १९ रुपये आणि वर कांहीं तरी ५।६ आणे झालें होतें. त्या गिऱ्हाइकानें १९ रुपये दिले, परंतु वरचे पैसे देईना. तो तसाच चालूं लागला. गिऱ्हाईकाशीं भांडण्याचें माझें ध्येय नव्हे. त्यामुळें त्या गिऱ्हाईकाशीं मी हुज्जत घालून भांडत बसलों नाहीं. मीं एवढेंच केलें कीं बाबांस प्रार्थिलें आणि म्हटलें, 'बाबा, जशी तुमची इच्छा!' एवढ्यांत तें गिऱ्हाईक दुकानाच्या पायऱ्या उतरूं लागलें होतें. त्यानें सहज मागें पाहिलें तों त्याचें लक्ष आमच्या दुकानांत असलेल्या साईबाबांच्या फोटोकडे गेलें. मी हें सर्व पाहातच होतों. त्या फोटोकडे त्या गिऱ्हाईकाचें लक्ष गेलें मात्र, लगेच तो मागें परतला, माझ्याकडे आला आणि जे काय वरचे आणे द्यावयास तो आतांपर्यंत तयार नव्हता, ते त्यानें तावडतोब देऊन टाकले आणि तो मुकाट्यानें परतला. आणि मग मला खात्री पटली कीं, साईबाबांनींच त्याला पैसे देऊन टाकण्याची प्रेरणा केली असावी.

× × ×

## [ ९ ] लक्ष्मीबाईचें वेड नाहींसें झालें

श्री. दत्तात्रय परशुराम खोपकर, रा. आगरवाला नगर, बिल्डिंग नं. १, ब्लॉक नं. ११, व्हिन्संड रोड माटुंगा ( मुंबई नं. १९ ) हे नुकतेच शिर्डीस आले असतां त्यांनीं खालील अनुभव सांगितला—

"आमचें कुटुंब सौ. लक्ष्मीबाई ह्या ८ वर्षें डोकें फिरल्यामुळें वेड्यासारख्या झाल्या होत्या. डॉक्टरी इलाज केले, पण काडीचाही गुण नाहीं. देवाधर्मावर विश्वास असल्यामुळें कांहीं साधुसंतांची गांठ घेऊन कृपाप्रसाद मिळविण्याचा प्रयत्न केला व त्यापायीं पुष्कळ पैसा खर्च केला. दुर्दैवानें ते सर्व साधुसंत भोंदू व पैसेखाऊ ठरले. हजारों रुपये खर्च झाले. पुन्हां शेवटीं डॉक्टरची औषधें चालू केलीं. परंतु तब्येतींत फरक तर पडला नाहींच; उलट वेडाचें प्रमाण मात्र दिवसेंदिवस वाढत चाललें. शेवटीं डॉक्टरांनी सांगितलें कीं, आतां आमचेजवळ औषध नाहीं!

"अशा स्थितींत साईबाबांची माहिती मला माझ्या एका मित्रानें दिली. अगोदरच माझा देवाधर्मावर विश्वास असल्यामुळें त्या मित्राच्या म्हणण्यावर माझा चटकन् विश्वास बसला व मी माझ्या कुटुंबास शिर्डीस बाबांच्या दर्शनास नेण्याचा निश्चय केला. ह्याच सुमारास आमच्या कुटुंबाच्या कांहीं नातेवाईकांनीं तिला वेड्याचे हॉस्पिटलमध्यें नेऊन ठेवण्याची तयारी केली. परंतु साईबाबांची जी माहिती मला कळली होती त्याचेवर माझा विश्वास बसून मीं त्यांचे बेतास कबुली दिली नाहीं व मीं माझ्या कुटुंबास १९५०-५१ मध्यें शिर्डीस सुमारें ३ वेळां बाबांच्या दर्शनास आणलें. तिच्या वेडाचे स्थितींत बरीच सुधारणा झाली. इतक्यांत माझ्या ऑफिसमधील एका स्नेह्यानें माझी एका साईभक्त सत्पुरुषाची गांठ घालून दिली. त्या सत्पुरुषांना 'गुरुजी' म्हणून ओळखतात. त्या स्नेह्यानें

मला त्यांचेकडे नेल्यावर मीं माझी सर्व हकीगत त्यांना सांगितली. तेव्हां प. पू. गुरु
कृष्णीनी साईबाबांचा एक फोटो मला देऊन त्याची पूजा करण्यास सांगितलें आणि 'तुझ्या कुटुं
बास १५ दिवसांत संपूर्ण गुण येईल' असा आशीर्वाद दिला. त्यांच्या सांगण्यावरून साईबाबां
च्या फोटोची मीं मनोभावें पूजा करूं लागतांच, आश्चर्याची गोष्ट अशी कीं, १२ वे दिव
आमच्या कुटुंबास संपूर्ण बरें वाटून तिची वेडाची लहर सर्वस्वीं नाहींशी झाली. अ
आणि ८ वर्षांपूर्वी ज्याप्रमाणें जबाबदारीनें ती घरांतलीं कामें पहात होती त्याचप्रमाणें
ती आतांही घरांतलीं सर्व कामें पाहात आहे, आणि बाबांची सेवाही अत्यंत एकनिष्ठेनें क
करित आहे. आज दोन वर्षें झालीं तिची वेडाची लहर अजिबात उलटली नाहीं, उलट
ती कधींकाळी वेड्यासारखी वागत होती असेंहि कधीं आतां वाटत नाहीं, इतकी ति
तिची वागणूक सर्वसामान्य माणसासारखी चांगली झाली आहे.

"केवळ श्रीसाईबाबांच्या कृपेमुळेंच आणि प. पू. गुरुजींच्या आशीर्वादानें म
माझा संसार आतां सुरळीत, सामान्य माणसासारखा चालू आहे."

× × ×

## [ १० ] संकटें कमी करण्यासाठीं बाबा घरांत आले....

श्री. एम्. के. शेट्टी, मॅनेजर, जी. ए. सर्कस ऑफ् बॉंबे (टूरिंग) (काय
च्या राहण्याचा पत्ता—सर्कस लॉज, कोडीयालव्हेल, मंगलोर-३) हे नुकतेच शि
शिर्डीस आले असतां त्यांनीं बाबांच्या लीलेचा खालील अनुभव सांगितला—

'आमच्या मंगलोरपासून ९ मैलांवर गुरुपुर म्हणून एक गांव आहे. तेथें 'श्रीव
वरदराज वेंकटरत्नम्'चें देऊळ आहे. तेथील मुख्य पुजाऱ्याच्या अंगांत येतें. त्य
त्याला आमचेकडे 'आवेश' म्हणतात. मुख्य पुजारी ज्या वेळेस 'आवेशांत' असतो
त्या वेळेस—ज्याला कांहीं देवाजवळ मागणें मागावयाचें आहे त्यानें आपल्या अडचणींब
द्दल वगैरे जर प्रश्न विचारले तर त्याचीं उत्तरें मिळतात आणि त्याप्रमाणें वागल्यास प्र
प्रश्न विचारणाऱ्याचें कल्याण होईं असा माझा अनुभव होता. माझ्या संसारांत ज्या
ज्या वेळेस अडचणी येत त्या त्या वेळेस मी त्या पुजाऱ्यास तो 'आवेशांत' असतांना
प्रश्न विचारीं आणि तो जीं उत्तरें देई त्याप्रमाणें वागें. त्यामुळें माझें बहुतेक कल्याणच हो

'माझ्या घरांत देवपूजा होत असे, परंतु आमच्या घरीं कोणत्याहि देवाचा
किंवा संताचा फोटो नव्हता. अशा तऱ्हेचा एखादा फोटो आपल्या घरांत असावा व त
पूजा करावी असें मला वाटूं लागलें. म्हणून मीं, एके वेळेस गुरुपूरला 'श्रीवर
वेंकटरत्नम्' चे दर्शनास गेलों असतां तेथील मुख्य पुजाऱ्यास तो 'आवेशांत' अस
(रोज ठराविक वेळीं त्यांचे अंगांत येई), ह्याबद्दल प्रश्न केला. त्यानें उत्तर दिलें
कि फोटोचे दुकानांत शिरतांच समोर जो फोटो दिसेल तो घे. त्याप्रमाणें ज्या दुक
देवाचे व संताचे फोटो विक्रीस ठेवलेले असतात त्या दुकानांत मी शिरलों,
आणि प्रथमच मला समोर जो फोटो दिसला तो द्वारकामाईमधील बाबांचा! तो फोटो
श्री ताबडतोब विकत घेतला, घरीं आणला आणि त्याची पूजा करूं लागलों. फि

वर

संबंधीचे कामास गेलों कीं माझी बायको किंवा घरांतील इतर मंडळी फोटोची पूजा करीत. बाबा आमचे घरीं अशा रीतीनें आले. पण दोन महिन्यांतच माझ्यावर संकटें कोसळूं लागलीं.

'माझी बायको क्षयानें आजारी पडली. तिला मदनपल्ली सॅनिटोरियममध्यें ठेवण्यांत आलें. तेथील मेडिकल सुपरिंटेन्डेण्टनें रोगी लोकांची गर्दी असूनसुद्धां माझ्या बायकोस तावडतोब दाखल करून घेतलें. मला त्या वेळेस फार आश्चर्य वाटलें; पण ह्यांत कांहीं बाबांची कृपा असेल अशी स्पष्ट जाणीव मला त्या वेळेस झाली नाहीं. तीन वर्षें झालीं तरी माझ्या बायकोचा आजार बरा झाला नाहीं. उलट फुफ्फुसाच्या क्षयांत आतां तिला आणखी मूत्राशयाचा क्षय झाला. सारखा पूं वाहात असे. माझी बायको वैतागून गेली. ती अगदीं करुणाजनक व रडूं आणणारीं पत्रें मला लिहूं लागली. मी तीं सर्व पत्रें बाबांच्या फोटोसमोर ठेवीत असें. शेवटीं एक दिवस अतिशय वैतागाचें असें तिचें पत्र मला आलें. तेव्हां मला अत्यंत वाईट वाटून मी बाबांच्या फोटोसमोर उभा राहिलों आणि त्यांना तें पत्र वाचून दाखविलें आणि प्रार्थिलें कीं, 'बाबा! आतां आमच्या दुःखाची परमावधि झाली. हा सगळा त्रास व माझ्या बायकोचा आजार एका क्षणांत नाहींसा करणें आपणांसच सर्वस्वीं शक्य आहे. अजून आमच्यावर आपण दया कां करीत नाहीं? आमच्या धीराची व निष्ठेची आपण परीक्षा पाहात आहां काय? आम्हां पामरावर दया करा आणि माझ्या बायकोस तावडतोब आराम पडूं द्या.' अशी अत्यंत निर्वाणीची व कळकळीची प्रार्थना मीं केली. मला कांहीं साक्षात्कार किंवा दृष्टान्त झाला नाहीं, परंतु दुसरेच दिवसापासून माझे बायकोस आराम पडूं लागला व तिच्या प्रकृतींत फरक पडूं लागला. पुढें डॉक्टरांच्या कौशल्यानें व साईबाबांच्या कृपेमुळें केवळ ३ महिन्यांतच माझी बायको वरील दोन्ही आजारांतून संपूर्ण बरी झाली आणि आज तिची प्रकृति उत्तम असून सुखवस्तु सामान्य बायकांप्रमाणें ती घरांतलीं कामें करीत असते.

'आतां ज्या ज्या वेळेस मी ह्या आजाराचा विचार करूं लागतों त्या त्या वेळेस मला मन अगदीं गहिंवरून येतें. कारण संकटपरंपरा सुरू करण्याकरतां म्हणून नव्हे तर आपल्यावर येणारी संकटपरंपरा ओळखून ती सौम्य करण्याकरतां म्हणूनच बाबा माझ्या घरांत येऊन राहिले असले. कारण बाबांच्या कृपेचे असे पुष्कळसे अनुभव आम्हांस पुढें आले.'

× × ×

## [११] मुलाच्या श्रद्धेला बाबांची साद

श्री. एम्. के. शेट्टी यांचा दुसरा अनुभवः—

'सुमारें दीड एक महिन्यापूर्वीची गोष्ट. माझा मुलगा रत्नाकर याचे पायास सूज आली होती. बराच त्रास होत होता पण त्यानें तिकडे लक्ष दिले नाहीं. १०।१२ दिवस झाले तरी सूज उतरेना. तेव्हां त्याला काय वाटलें कोण जाणें, त्यानें बाबांचा फोटो समोर

धरला व त्यांचें पायास चंदनाचें तेल लावलें आणि त्यानंतर बाबांच्या पायाचें तें आपल्या पायास लावून नंतर त्याचेवर उदी चोळली. २।३ दिवसांत सूज पार नाहीं होऊन त्रासही बरा झाला व आज ज्या पायास सूज आली होती तो पाय पूर्वी सारखा उत्तम झाला आहे.'

× × ×

## [१२] अश्रद्धाचा अहंकार असा नाहीसा झाला

**श्री.** रामचंद्र वामन पाटणकर, रिटायर्ड हेडक्लार्क, पोलिस डिपार्टमेंट, अलिबाग जिल्हा–कुलाबा (हल्लीं वय ७०. राहणार–आरामबाग, रेगे यांचा बंगला घंटाळी रस्ता, ठाणा) हे नुकतेच शिर्डीस आले असतां त्यांनीं खालील अनुभव सांगितला

'१९१०।११ सालांतील गोष्ट. मी त्या वेळेस कस्टममध्यें कारकून होतों. पगार अवघा ३० रु. होता. संसारखर्चास एवढे थोडेसे पैसे पुरत नसत, कारण प्रपंच मोठा होता. मी मूळचा शिवभक्त आहें. परंतु या काळजीच्या योगानें कोणा तरी संताची कृपा व्हावी असें फार वाटे. कारण जें देव करूं शकत नाहीं तें संत करून दाखवितात, असा संतांचा महिमा आहे. योगायोगानें अक्कलकोटस्वामींवर श्रद्धा जडली व त्यांची मी मनापासून भक्ति करूं लागलों. त्या वेळेस दादर येथें (राम मारुती रोड) बाळकृष्णबोवांच्या मठांत


# स्वदेशी ट्रंक फॅक्टरी अँड शॉप

मालक : महादेव विनायक इंदूलकर

आमच्या फॅक्टरींत हरतऱ्हेच्या मजबूत व टिकावू ट्रंक्स, साध्या व हॉस्पिटल्साठीं लागणाऱ्या कॉटस्, पाळणे, तसेंच होल्डॉल्स्, लेदर सूट केसीस, छत्र्या, रेनकोटस् तयार होतात

आणि

घाऊक व किरकोळ मार्केट भावानें खालील ठिकाणीं मिळतात.

| (१) सरकारी तबेला | (२) फॅक्टरी | (३) विजयनगर |
|---|---|---|
| २५२, गिरगांव | भवानीशंकर रोड | बी. बी. स्टेशन समोर |
| मुंबई ४ | दादरकर वाडी, मुंबई १४ | दादर, मुंबई |

पावसाळ्यासाठीं छत्र्या व रेन–कोटस्च्या ऑर्डरी नोंदवा

अक्कलकोटस्वामींची भव्य व तेजःपुंज, अशी उभी असलेली एक तसबीर होती व तिचे दर्शनार्थ त्या मठांत मी वारंवार जात-येत असें.

'त्या वेळेस दासगणू महाराजांचीं मुंबईत श्रीबाबांवर कीर्तनें होत. कीर्तनास फार मोठा समुदाय हजर असे. तीं कीर्तनें ऐकून हजारों लोक शिर्डीस जाऊन बाबांचें दर्शनही घेऊन आले. पण मला कांहीं जाण्याची इच्छा होईना. कारण कीर्तनांत कांहींही जरी इतर सांगितलें तरी बाबांची राहण्याची, बोलण्याची व वागण्याची पद्धत पाहतां ते एक मुसलमान फकीर असावेत असा माझा पक्का ग्रह झाला, व आपल्या धर्माचे इतके साधुसंत असतांना ते सोडून एका मुसलमानाच्या पायां पडण्यास मन कांहीं घेईना. परंतु श्री. घनःश्याम गुते या नांवाच्या माझ्या एका मित्रास (हा रेल्वेंत नोकर होता) शिर्डीस जाण्याची फार तीव्र इच्छा झाली, व त्यानें मलाही चलण्याचा फार आग्रह केला. परंतु मीं नकार दिला. तेव्हां निदान सोबत म्हणून तरी चलण्याबद्दल त्यानें मला फारच गळ घातली. तेव्हां ही ब्याद टळावी म्हणून मीं त्यास म्हटलें कीं, माझ्या जाण्या-येण्याचा व तेथल्या राहण्याचा खर्च तूं सोसला पाहिजेस. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो या गोष्टीस सर्वस्वीं कबूल झाला. तेव्हां मला नकार देण्यास कोणतेंच कारण सांपडेना. म्हणून मी शेवटीं नाइलाजानें त्याच्याबरोबर जाण्यास कबूल झालों; परंतु, मीं त्यास सांगितलें कीं, बाबा हे आपल्या दर्शनास येणाऱ्या मंडळींकडून दक्षिणा मागतात; तेव्हां त्यांनीं जर मजजवळ दक्षिणा मागितली तर मीं त्यांना १ रुपया-पेक्षां जास्त पैसे देणार नाहीं. हा रुपयासुद्धां देण्याची माझी इच्छा नाहीं, पण आपल्या मित्राची चारचौघांत फजिती होऊं नये म्हणून तेवढे पैसे देईन. यावर त्यानें 'बरें' म्हटलें व नंतर २।४ दिवसांनीं आम्ही शिर्डीस आलों.

'शिर्डीस त्या वेळेस एकच खाणावळ होती. तेथें आम्ही जेवावयास गेलों. अन्न खराब होतें. आमटीमध्यें व भातामध्यें किडी (अळ्या) होत्या. मला फटाळा आला व रागही आला. मी गुतेस म्हणालों, "काय हें खराब अन्न! लोक इतक्या लांबून येथें येतात ते काय किडीचें अन्न खायला? लाज नाहीं वाटत या लोकांना असलें खराब अन्न वाढायला!!" त्यावर गुते मला म्हणाले, "अरे, असलें कांहीं येथें बोलूं नकोस! कारण येथें एकच खाणावळ आहे आणि बाबांनीं जर आपणांस परत जाण्याची परवानगी दिली नाहीं तर पुन्हां येथेंच जेवावें लागेल. व तो खाणावळवाला जर तुझें बोलणें ऐकेल तर आपणांस जेवण मिळणार नाहीं, आणि फुकट उपाशी राहण्याची पाळी येईल." त्यावर मी ताडकन् म्हणालों कीं, माझी कांहीं बाबांवर एवढी श्रद्धा नाहीं व त्यांनीं जरी परवानगी दिली नाहीं तरी मी जाणार; एथें संध्याकाळचें अन्न खायला राहणार नाहीं. त्यावर गुते चूप बसले व नंतर आम्ही दोघे बाबांचें दर्शन घेण्यास मशिदींत गेलों.

'बाबा मशिदींत कठड्यावर हात टेकून व धुनीकडे तोंड करून बसले होते. आजूबाजूस बरीच भक्तमंडळी बसली होती. मी दर्शनार्थ वर जातों तोंच बाबांनी मजकडे पाहिलें व एकदम खवळून ते म्हणाले, 'चले जाव! उतरो उतरो!!' अगोदरच मी

बाबांबद्दल अश्रद्ध, व त्यांत त्यांचे हे रागाचे उद्गार!! माझेंही पित्त खवळलें व मी पायरी न चढतां खालीं उतरलों व गुप्तेस म्हणालों कीं, मी जातों. त्यावर गुप्तेनें व इतर भक्तमंडळींनीं मला रोखून धरलें व माझी समजूत घालण्याचा प्रयत्न केला व सांगितलें कीं, पुन्हां थोड्या वेळानें दर्शन घेण्याचा प्रयत्न करा. माझी समजूत अर्थातच पटली नाहीं, परंतु मित्राखातर मीं तेथेंच राहिलों. मग गुप्ते यांनीं व आणखी कांहीं थोड्या भक्तांनीं बाबांचें दर्शन घेतल्यावर मीं पुन्हां वर जाण्याचा प्रयत्न केला व हळूच दबकत दबकत पायरी चढूं लागलों. पण या वेळेस बाबा कांहीं रागावले नाहींत. मी शेवटची पायरी चढतों न चढतों तोंच बाबा तिसरीकडे पहात म्हणाले, 'अरे येथें लोक येतात कशाला? फिडीचें अन्न खायला? लाजा नाहीं वाटत असलं खराब अन्न घालायला?' आजूबाजूचे भक्त लोक एकमेकांकडे पाहूं लागले. कारण बाबा कोणाबद्दल व कोणाला उद्देशून बोलत आहेत हें कोणासच समजेना. पण मी व गुप्ते मनांत समजलों व एकमेकांकडे अर्थपूर्ण नजरेनें पाहूं लागलों. कारण मीं गुप्तेजवळ व्यक्त केलेले माझेच विचार बाबांनीं बोलून दाखविले. त्यावर माझा सर्व अहंकार गळाला व मीं बाबांचे पायावर मोठ्या नम्रभावानें व भक्तिपूर्वक अंतःकरणानें डोकें टेवलें व ~~खालीं बसलों~~. बाजूस बसलों.

'नंतर थोड्या वेळानें बाबांची आंघोळ झाली व त्यांना गंध वगैरे लावण्यांत आलें. त्यानंतर ते उभे राहिले तों ते साक्षात् मला, मी बाळकृष्ण मठांत पाहिलेल्या अक्कलकोटस्वामींच्या मूर्तीसारखेच भासले. अशा रीतीनें आपण व अक्कलकोटस्वामी-महाराज निराळे नव्हेत असें त्यांनीं मला दाखवून दिलें. तेव्हां माझा उरला सुरला सर्व अविश्वास नाहींसा झाला व मीं आपणहून मोठ्या आनंदानें त्यांना १ रुपया दक्षिणा दिली. त्यावर बाबा मजकडे पाहून किंचित् हंसले व आणखी १ रुपया दक्षिणा मजजवळ, जणूं कांहीं माझी परीक्षा घेण्याकरितांच मागितली. मीं त्यांना दुसरा रुपया दिला. कारण आतां त्यांच्यावर माझी श्रद्धा बसली होती. नंतर त्यांनीं मला जाण्यास परवानगी दिली व आम्हीं त्याच दिवशीं मुंबईस परत गेलों.

'त्यानंतर मी आर्थिक संकटांतून मुक्त झालों व लवकरच पुढें चांगल्या पगाराची व मानाची नोकरी मिळाली व कुटुंबसौख्यहि चांगलेंच लाभलें."

~~~~~ \* \* \* ~~~~~

कामभावना आणि स्वार्थ या दोहोंची तुमच्या मनांतून हकालपट्टी करा कीं जीवनांतलें सर्व दुःख चट्‌ सारें पळून गेलें आहे असें तुम्हांला आढळून येईल.

—जेम्स ॲलेन

नलिनीदलगतजलमतितरलम् ।

तद्वज्जीवितमतिशयचपलम् ॥

कमळाच्या पाकळीवरील पाणी जितकें चंचल तितकेंच हें जीवित अत्यंत अस्थिर आहे.

—श्रीशंकराचार्य
~~~~~

ग्रासोग्रासीं हरिस्मरण । तें अन्नचि होय ब्रह्मपूर्ण

# रसनेंद्रिय प्रथम जिंका

लेखक : रामचंद्र कृष्ण कामत, माशेल, ( गोवा )

जितेंद्रिय झाल्याशिवाय अतींद्रिय सुख मिळणार नाहीं. प्रपंचांतसुद्धां अब्रूनें व सुखानें दिवस घालवायचे असतील तर इंद्रियें ताब्यांत ठेवून वागलें पाहिजे; मग परमार्थांत तसें करायला नको काय? सर्व इंद्रियांत जीभ हें फार बलवत्तर इंद्रिय आहे. या जिभेंत तीन इंद्रियें असतात. एक रसनेंद्रिय, दुसरें त्वगिंद्रिय ( स्पर्श जाणणारें इंद्रिय ) व तिसरें वागिंद्रिय ( वाणी अथवा बोलणारें इंद्रिय ). या तिहींत रसनेंद्रिय महाबलवत्तर आहे. (पैकीं पहिलीं दोन ज्ञानेंद्रियें व तिसरें कर्मेंद्रिय आहे.) रस–विषय हा इतर शब्द, स्पर्श, रूप व गंध या चार विषयांपेक्षां शरीराच्या जगण्याला अत्यंत जरूरीचा. बाकीचे चार विषय सेवन न केलें तरी मनुष्य मरणार नाहीं. रस–विषय सेवन केला तरच मनुष्य जगेल.

ज्ञानेश्वरमहाराज रसनेंद्रियासंबंधीं सांगतात—'श्रोत्रादि इंद्रियें आवरितीं। परि रसने नियमु न करिती । ते सहस्रधा कवळिजती । विषयीं इहीं ।।...येरा इंद्रिया विषय-तुटे । तैसा नियमूं नये रस हटें । जें जीवन हें घटे । येणें वीण ।। '

रस–विषय म्हणजे जेवणखाण इत्यादि. जेवतांना 'अन्नं न निंद्यात्' म्ह. जेवतांना खोड्या काढून जेवूं नये, असें शास्त्रांत सांगितलें आहे. 'अन्न कसें तयार करावें' याबद्दल विद्वानांनीं पाकशास्त्राचीं पुस्तकें लिहिलीं आहेत; पण 'अन्न कसें जेवावें' याबद्दल कोणीं कुठें प्रसिद्धपणें लिहिलेलें आढळत नाहीं. नाहींच म्हटल्यास कांहीं स्मृतिग्रंथांत व प्रा. 'गुरुचरित्र' या ग्रंथांत लिहिलेलें आढळतें. अन्नाचे सात्त्विक, राजस, तामस असे प्रकार भगवद्गीतेंत व भागवतांतही सांगितले आहेत. जेवतांना ब्राह्मणांनीं 'सत्यंत्वर्तेन परिषिंचामि' या मंत्रानें पात्रासभोंवतीं पाणी फिरवून चित्राहुति घालणें व नंतर एका मंत्रानें आपोषण घेणें व त्यानंतर दुसऱ्या मंत्रांनीं प्राणाहुति घेणें इ. विधि सांगितले आहेत.

शास्त्रकारांनीं प्रत्येक कर्म 'यज्ञ'रूप होण्याकरतां त्याला विधि सांगितले आहेत. त्या त्या विधीनें तें तें कर्म केलें असतां त्याला निराळें म्ह. यज्ञाचें स्वरूप प्राप्त होतें. विधीमध्यें मोठी शक्ति असते. उदाहरणार्थ–चित्रामध्यें आडव्या तिडव्या रेघांशिवाय दुसरें काय असतें? पण नुसत्या आडव्या उभ्या रेघांनीं चित्र तयार होत नाहीं; एका विशिष्ट पद्धतीनेंच त्या काढल्या म्हणजे चित्र तयार होतें! ह्या पद्धतीलाच 'विधि' म्हणतात. गायनांत तोंडांतून ध्वनि काढण्यापलीकडे काय असतें? पण तो ध्वनि त्या शास्त्रांतील विधीप्रमाणेंच काढला तर गायन होतें, नसल्यास रडणें ओरडणें होईल!

नृत्यामध्यें हातपाय हालविण्यापलीकडे काय असतें ? पण त्या विद्येच्या शास्त्रांत सांगि-तल्याप्रमाणें ती क्रिया केली तरच तें नृत्य होईल; नाहींतर तो धांगडधिंगा या सदरांत जाईल! तात्पर्य जेवण म्हणजे पोटाची खळगी भरणें नव्हे. तें एक पवित्र यज्ञकर्म आहे. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म!' पण तसें तें केव्हां होतें ? तर पाठीमागील चरणांतील 'वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें। सहज हवन होतें नाम घेतां फुकाचें। जिवन करि जिवित्वा अन्न हें पूर्ण ब्रह्म।' इ. विधि लावला जाईल तेव्हां! जेवण तर असोच, पण स्त्रीसंग हा सुद्धां विधिपूर्वक केला तर त्यास 'वामदेव यज्ञ' म्हणतात. वैष्णवी ऋग्वेद ब्रह्मकर्मांत याविषयीं माहिती छापली आहे. तात्पर्य, शास्त्रविधीनें कर्माला 'यज्ञाचें स्वरूप' प्राप्त होतें. याकरितां अन्न खातांना मोठ्या आदरानें खाल्लें पाहिजे. आंबट, तिखट, खारट पडेल तें खावें असा त्याचा अर्थ नाहीं; पण तसें कांहीं झालें तरी त्याबद्दल तिखट शब्दांनीं तुच्छता दर्शवूं नये. बहुतेक श्रीमंतांच्या मुलांना ही खोड असलेली दृष्टीस पडते! अन्नासाठीं लोक कसे तळमळतात, तडफडतात, दारोदार हिंडतात हें त्यांना समजावून मस्ती न करण्याबद्दल लहानपणींच बजावलें पाहिजे. कारण त्यांना पाप-पुण्याचें ज्ञान नसलें तरी सृष्टिनियमानुसार 'कर्मभूमीच्या कठोर कायद्या'प्रमाणें त्यांना पुढचा जन्म दारिद्र्याचा येईल, किंवा याच जन्मांत सुग्रास अन्नाची घरांत सर्व अनुकूलता असतांहि कसल्यातरी व्याधीमुळें त्यांना तें अन्न खातां येणार नाहीं! प्रसिद्ध विद्युच्छास्त्रज्ञ बेंजामिन फ्रँक्लिन यांच्या चरित्रांत, 'बापानें आम्हां सर्व मुलांना जेवतांना बरें वाईट कांहीं न म्हणतां पानांत पडेल तें मुकाट्यानें खाल्लें पाहिजे, अशी सक्त ताकीद दिली होती; त्यामुळें आमचें पुढील आयुष्य फार सुखाचें गेलें.' असें लिहिलें आहे. असो. आमच्या उपनिषदांतही 'अन्नं ब्रह्म' हा विषय सुंदर व विस्तृत सांगितला आहे.

पुन्हां शास्त्रांत असें सांगितलें आहे कीं, श्रीमंतांनीं 'असाक्षिभोजन' करूं नये. असाक्षिभोजन म्हणजे कोणी तरी पाहुणा-अतिथि वगैरे पंक्तीला घेतल्याशिवाय एकट्यानें जेवणें! निदान आपलीं मुलें तरी पंक्तीस घ्यावीं. आपल्या मुलांचे आपण मालक नसून पालक आहोंत, हीं देवाचीं लेकरें आहेत, देवानें आपणास त्यांचे जिम्मेदार नेमलें आहे. अशा भावनेनें आपण लहान मुलांकडे पहावें व त्यांना आदरानें वागवावें. जेवतांना मस्ती करूं नये, पानावर पडेल तें आदरानें खावें, असा बोध शक्य तो प्रेमळ शब्दांनीं करावा. घरांत नैवेद्य वैश्वदेव होत असेल तर बरें आहे; तसें होत नसल्यास पळीभर भात बाहेर काढून त्यावर तूप घालून चार चिमटी भात देवाचें नांव घेत अग्नींत टाकावा व बाकीचा भात कावळ्यास टाकून नंतर आपण जेवावें. गोग्रासही काढून गाईला घालावा. सारांश, दुसऱ्याला दिल्याशिवाय आपण खाऊं नये. आपण जें खातों तें प्रथम देवापुढें ठेवून नैवेद्य दाखवून खात असावें. अनिवेदित अन्न भक्षण करूं नये. चहा, कॉफी, ब्रेडसुद्धां देवाला दाखवून नंतर आपण खात असलेले प्रेमळ भक्त मीं पाहिले आहेत. ताटांतील अन्नाला नमस्कार करून व देवानें आपणांस हें अन्न दिलें आहे व खाण्याची शक्ति म्हणजे आरोग्यही दिलें आहे असें म्हणून कृतज्ञतेनें त्याचे आभार मानून वर

सांगितल्याप्रमाणें नामस्मरण करीत जेवीत असावें. असें करणाऱ्या मनुष्याला जन्मोजन्मीं सुग्रास अन्नाची वाण पडणार नाहीं.

धर्मशास्त्रांत प्रत्येक कर्म यज्ञरूप होण्याबद्दलचा विचार अथवा विधि सांगितला आहे; तर अध्यात्मशास्त्रांत प्रत्येक कर्म ब्रह्मरूप करण्याचा विचार अथवा विधि सांगितला आहे. नाथरायांनीं आपल्या भागवतांत अन्नरसाचा ब्रह्मरस कसा करावा हें इतक्या ठिकाणीं यक्ति-प्रयुक्तीनें सांगितलें आहे कीं, तसें इतर कोणत्याच संतांनीं कोणत्याच ग्रंथांत सांगितलेलें नाहीं! पंचविसाव्या अध्यायांतील २८ व्या श्लोकाच्या टीकेंत श्लोकोक्त सात्त्विक, राजस, तामस आहार सांगितल्यानंतर त्रिगुणापलीकडील 'निर्गुण' आहाराचें वर्णन त्यांनीं स्वतंत्र प्रतिभेनें केलें आहे. त्यांत ते म्हणतात—

> 'भगवंताचा भुक्त प्रसाद। साधुजनांचे शेष शुद्ध। हा निर्गुण आहार प्रसिद्ध। 'च'कारें गोविंद बोलिला॥ ग्रासोग्रासीं गोविंद। येणें स्मरणें अन्नशुद्ध। हा निर्गुण आहार प्रसिद्ध। 'च'कारें गोविंद बोलिला॥ 'अन्नं ब्रह्म अहंच ब्रह्म'। पंक्तीकर तोही ब्रह्म। ऐसा ज्यांचा भोजनानुक्रम। तो आहार परम निर्गुणत्वें॥' इत्यादि.

या शिवाय अध्याय २, ८, ११ व पुढेंही अनेक ठिकाणीं रस व रसना या संबंधानें जातां जातां सहजसुंदर उद्गार काढले आहेत; पण त्या रसनाजयाची गुरुकिल्ली मात्र आठव्या अध्यायांत अवधूताच्या मुखानें कृष्णानें उद्धवास सांगितली आहे. ती साधकांनीं लक्षांत ठेवून त्या अनुसंधानानें रस विषय सेवन करण्याचा अभ्यास केला पाहिजे. नाथ म्हणतात–

> " जंव रसना नाहीं जिंकिली। तंव 'जितेंद्रिय' ही मिथ्या बोली। जैं साचार जिंकिली। तैं वाट मोडिली विषयांची॥ (जिंकण्याचें वर्म सांगतात) विषयां आंतील गोडपण। रसने आंतील जाणपण। दोहींसी ऐक्य केल्या जाण। रसना संपूर्ण जिंतिली॥ १८५॥"

यांचा भावार्थ असा कीं, विषयांतील गोडपण म्ह० रुचि (गोड, तिखट, आंबट वगैरे), जिभेंतील जाणपण म्ह. जाणीव शक्ति या दोन्हींचें ऐक्य करणें अर्थात् विषयांतील चैतन्य व रसनेंतील चैतन्य दोन्हीं एक आहेत व आत्मचैतन्याशीं तें अभिन्न आहे, अशा अनुसंधानानें पदार्थ खाणें, या योगेंच रसना जिंकली जाते. (उपवासादि व्रतांनीं जिंकली जात नाहीं) हें रसना जिंकण्याचें वर्म आहे. जिभेंतील या ज्ञानेंद्रियाच्या जयानें 'ब्रह्मसायुज्याचें ठाणें' हातांत सांपडतें अशी त्याची फलश्रुति सांगितलेली लक्षांत घेण्यासारखी आहे. नाथ म्हणतात—

> 'रसनाजिताचें *वाधावणें। ब्रह्मसायुज्यीं पडे ठाणें। सोहळा परमानंदें भोगणें। रसना जेणें जिंकिली॥–(अध्याय ८, ओ. १८७).

असें ज्याचें महत्त्व आहे, त्याचें किती वर्णन करावें?

---

*वाधावणें म्ह. वरागमन प्रसंगींचीं मंगल वाद्यें, वरागमनाची सूचना.

जिलबी, श्रीखंड, आंबरस–पुरी किंवा पेढे–बर्फी व चकल्या–कडबोळीं अथवा सुंदर आपोस आंबा खातांना अगर फक्त चहा–कॉफी–कोको व गार आईस्क्रीम, सरबत इ. पितांना त्या पदार्थांचें गोड–आंबट–तिखट इ. रसज्ञान हें जिभेंतील रसनेंद्रियाला समजतें; तसेंच त्या पदार्थांचा मृदु–कठिणपणा व उष्ण–शीतपणा यांचें स्पर्शज्ञान हें जिभेंतील त्वगिंद्रियाला (त्वचेला) समजतें. हें रस–विषयांचें ज्ञान व स्पर्श–विषयांचें ज्ञान चैतन्यरूप आहे; अथवा आत्मचैतन्यच पंच विषयांच्या रूपानें नटलें आहे. अशा धारणेनें रसविषय सेवन करणें म्हणजे अन्नरसाचा ब्रह्मरस करणें होय.

'कटु मधुर नानारस। रसना सेवी सावकाश। परी तो अवघा ब्रह्मरस। स्वादीं सुरस परमानंदु॥' (अ. २।३८३). 'ताट अन्न आणि आपण। तो न देखे भिन्नपण। रसमिसें स्वानंद पूर्ण। सर्वांगें जाण सेवित॥ यालागीं जो जो रस सेवूं जाये। तो तो ब्रह्मरसुचि होये। मुक्ताची रसना यापरी पाहे। घेत आहे रसातें॥' (अ. ११।३११,१६).

ही झाली ज्ञान्यांची मनोधारणा. भक्तांची मनोधारणा थोडीशी निराळी असते.

'ग्रासोंग्रासीं हरिस्मरण। तें अन्नचि होय ब्रह्मपूर्ण। त्यासी नाहीं बाधकपण। ब्रह्मार्पण सहजेंचि॥ भक्तांची भजनस्थिति। विषयीं मद्रूपता भाविती। तेणें मावळे विषयस्फूर्ती। नव्हे ती या रीतीं बाधक॥ नाना साधनें विषयो त्यागिती। त्यागितां परमदुःखी होती। भक्त विषयो भगवंतीं अर्पिती। तेणें होती नित्यमुक्त॥ (अ.२८।४००-३).

साधकांनीं आपल्या मगदुराप्रमाणें हवी ती धारणा धरावी व या धारणेनें रस–विषयाचें सेवन करून उन्नत व्हावें. ॐ तत्सत्।

* * *

* विद्वत्ता आणि शहाणपण हीं एक नव्हेत. विद्वत्ता ही मागें वळून भूतकाळाकडे पाहात असते. शहाणपण हें पुढें भविष्यकाळावर नजर देऊन असतें.

—स्वामी रामतीर्थ

* आशाधारकपणा, हवं तें काम करण्याची तयारी आणि आपल्या कार्याबद्दल अत्यंत प्रेम एवढे तीन गुण तुम्हांजवळ असतील तर तुमचे पाय कोणासहि मागें ओढवणार नाहींत.

—स्वामी विवेकानंद

# माझ्या जीवींचा जिव्हाळा

लेखक : डॉ. के. भ. गव्हाणकर

संसार–धंदा करितां रिकामा । होशील केव्हां स्मरशील रामा ॥
आतां तरी तूं धरि एक नेमा । कामांत कामा भज रामनामा ॥
प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला ।
तो नर भला भला रे भला ॥

ईश्वराचें व आपलें सख्य–प्रेम झाल्यावांचून त्याचा प्रसाद व्हावयाचा नाहीं. विश्वाची सर्व उभारणी जीवावर व जीवाचा आधार प्रेम किंवा प्रियत्व, किंबहुना त्याचें जीवनच तें आहे. प्रीतीचा झरा आणि जिव्हाळ्याचा सतत ओलावा हें प्रभुरूप होय, व त्या प्रेमाच्या ओलाव्यांत पाझरणारें सजीव चैतन्य हें संतरूप होय. संत स्वानंदाचे पुतळे आहेत. तो 'श्री साई' माउलीचा जिव्हाळा शिरडींत नव्हे सर्वत्र सर्वांना जीवन देऊन मुखावर टवटवी आणीत आहे. तो भक्तवत्सल प्रेमप्रभू नित्यानंद जगदानंद प्रेमानंद सर्वेश्वर कृपादृष्टीनें सर्वांचें रक्षण करीत आहे.

जीवनांत जीवन (प्रेम) नसेल, तर जीव कासावीस होईल! जगणें नकोसें होईल! उदास वृत्तीनें जीवन कसेंबसें रेटण्याची पाळी येईल; आणिं मूळ धर्म सुटल्यामुळें अधर्माचरणानें सर्वस्वाची होळी होईल.

"जगतः स्थितिकारणं, अभ्युदयनिःश्रेयसं" असें आचार्यांनीं धर्माचें लक्षण केलें आहे. अर्थात् जगांतील सर्व वैषम्य घालवून मनुष्याची ऐहिक व पारमार्थिक उन्नति करून देणारा असा फक्त एक धर्मच होय. 'धृ–धारण-पोषणयोः' या धातूपासून धर्म हा शब्द तयार झाला. अर्थात् मनुष्याचें धारण म्हणजे अस्तित्व व पोषण या दोन गोष्टी ज्याचे योगानें होतात तो धर्म, आणिं तें मिळविण्यासाठीं जें आचरण केलें जातें तें धर्माचरण. धर्माला उपादान कारण ब्रह्मवस्तु. 'जीवो ब्रह्मैव नापरः' असें जीव–ब्रह्माचें ऐक्य असल्यामुळें ब्रह्माचे गुण धर्मांत व जीवांत आहेत.

ब्रह्म स्वतंत्र आहे. अर्थात् स्वातंत्र्य हा जीवाचा नैसर्गिक धर्म म्हणजे जन्मसिद्ध हक्क आहे. पण मानव आपलें स्वातंत्र्य गमावून त्रसला व दुसऱ्याचें कबूल करीना. काय हा वेडेपणा! स्वातंत्र्य हा धर्माचा आत्मा आहे. ही जाणीव ठेवून त्यानें आत्म्याचें श्रवण, मनन, निदिध्यासन करणें योग्य आहे; तसेंच 'एकमेवाद्वितीयं' असें ब्रह्म असल्यामुळें एकी हा जीवाचा धर्म आहे; व ती (एकी) उत्पन्न करणें, ती टिकवणें व तिला प्रोत्साहन देणें प्रत्येक मानवाचें धार्मिक कर्तव्य आहे.

गजांत, मंडळांत व मंगलकार्यांत एकी नसेल तर ते प्रेतवत् होतील. स्वातंत्र्य हा आत्मा, तर ऐक्य हा त्याचा प्राण आहे. हें निश्चित जाणून श्रीसद्‌गुरु माउलीनें धर्माची ज्योत पेटवली व त्या प्रकाशांत सर्वांना जीवन दिलें व अजून देत आहेत. यानां आपआपलें स्वातंत्र्य कायम राखून प्रेमभक्तीच्या निशाणाखालीं एकत्र केलें; ष सत्ता त्या प्रभूची ! कीं ज्यानें प्रेमच रामधनी निश्चित करून रामराज्य केलें; शिरडींत प्रेमसत्ता, वात्सल्याची, प्रीतीची व करुणतेची साच मूर्ति साई सगुण-ट झाली. (स+आई=साई)

ळानें लाथा मारावयाच्या आणि त्यानेंच आईला प्रेमपान्हा फुटावयाचा; बाळ पितें, तें पिण्याचें सुख पुरत नाहीं, मधुरतेची अवीट गोडी जिव्हारीं उतरत नाहीं. दातांत भिनतें, सळसळतें, मुखांत रसरसतें, आणि आईला कवळून कवळून ावतें. पण माता, मातृत्वाची प्रियता बाळाच्या चोखण्यांत आनंदानें अनुभवते; दुःख हें आत्यंतिक सुख वाटतें. प्रेमाला प्रेम पुरत नाहीं हें मुळांतील दुःख आहे. गर काय दुःख असेल तर तें हेंच !

स्वतंत्रता व ऐक्य–अनुभवाचें स्थान आईचें प्रेम होय. जगांतील वैषम्य नष्ट ऐहिक व पारमार्थिक सुखाच्या शिखरावर चढविणारी एक दिव्य शक्ति 'साई' न–माझे पंढरपुरांत गोदातटनिवासी भरून राहिली आहे.

'ऐसें कैसे रें सोवळें । शिवतां होतसे ओंवळें' असें पूर्वींचे साधुसंत म्हणत . पण सत्पुरुषानें, सोवळें नेसूं नये असें विधान केलेलें नाहीं. तर 'स्नानसंध्या ळा, पोटीं क्रोधाचा उमाळा' असें सांगून केवळ सोवळें नेसल्यानें सोंवळेंपणा येत तर क्रोधाचा त्याग करा आणि निजप्रेमाची ग्रंथी सोडा, असें सांगत आहेत. ; नेसलेल्याला कोणी स्पर्श केला तर तो विटाळ झाला असें मानतो आणि फण-ं; पण अमंगळ क्रोधानें आलिंगन दिलेलें चालतें हें कोणत्या शास्त्रांतील सोंवळें सत्पुरुषांचें एवढेंच सांगणें कीं बहिर्दृष्टि होऊं नका; अंतर्दृष्टि व्हा. नाहींतर 'बाह्य झळफळ । देहबुद्धीचा विटाळ' असें होईल.

मातेचें मातृत्व, प्रेमाचा परम ओघ औट देहांत गोठला गेला, तो जिव्हा-रे पाझरला तें बालक होय. पाण्याचें गोठून बर्फ होतें, त्या पांढऱ्या रंगाच्या ाला 'बर्फ' ही संज्ञा आहे. एरवी तें पाणीच पाणी आहे. सगुण वात्सल्यानें लें म्हणून 'आई साई' एरवी प्रेमाचा निर्गुण रसच. पावलोपावलीं आपल्या रसपान करण्यांत गुंग झालेली वात्सल्याची पूर्ण अंबिका गंगा (गोदा) तीरावर डी ग्रामीं प्रकट झाली. काय तिची थोरवी मी गाऊं ! प्रेम हें विश्वव्यापक म्याचें सगुणरूप आहे. विसर ही माया आहे व त्या मायेनें जीव झाला. ाचें एकदेशी शरीर व शरीराचे पंच विषय, यानें तो बद्ध झाला; व मायेनें दुःख भोगूं लागला; त्यामुळें स्वतःचा त्याला विसर पडला. याकरितां जीवानें

मायातीत झालें पाहिजे. त्यासाठीं कृपाळू , फलवाळू साई माउलीच्या नामकुशीत अहोरात्र विसांवा घेत झोंपी गेलें पाहिजे.

प्रभूला प्रेमप्रीति आलें म्हणजे संतरुपडीं हीं कधींच पुरत नाहींत, आणि संतांनाही आतां प्रभु पुरे झाला असें कधींच वाटत नाहीं. अपार गोडीला आईचे स्तन पुरत नाहींत. बाळाला आई व आईला बाळ असें कधींही पुरें होणें शक्य नाहीं.

'जहां प्रेम वहां नेम नहीं।
और जहां नेम वहां प्रेम नहीं ॥'

जीवांचा धर्म प्रेमानें प्रेमाची जोपासना करणें होय.

श्री साई माउलीचा थांग आम्हां मानवांच्या बुद्धीला कसा लागणार! त्यांच्या सतत सहवासांत असणाऱ्या भक्तांना ( नानासाहेब चांदोरकर वगैरेंना ) लागला नाहीं. "बाबा म्हणजे औट हात देह दिसतो तेवढाच का! अरे मी मुंगी किंवा दुसरें वाटेल तें रूप धारण करून खातों" असें बाबा म्हणत. मी सर्वांभूतीं आहें, हा भगवद्भावाचा धडा त्यांनीं सर्वांना शिकविला.

एकदां श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांची प्रेमळ पत्नी पानावर जेवावयास बसली असतां एक भुकेलेलें श्वान तेथें येऊन ओरडूं लागलें; लगेच त्या माईनें आपल्या पानावरील चतकोर भाकर त्या कुत्र्याला घातली. हें तिनें सहज केलें. तिच्या ध्यानींमनींहि नव्हतें. पण नित्य क्रमानुसार ती दुपारीं मशदींत दूर बसली असतां तिला बाबा म्हणूं लागले कीं, "आई त्वां आज मंज जेवूं घातले। तेणें हें आकंठ पोट भरलें ॥ होते हे प्राण व्याकूळ झाले। ते तृप्त केले गे तुवां ॥ ऐसेंच करीत जावें नित्य। हेंच कामी येईल सत्य ॥ मशीदींत बैसून मी असत्य। बोलेन हे त्रिसत्य घडेना। अशीच माझी दया जाणावी। भुकेल्या भाकर आधीं द्यावी। आपुल्या पोटा नंतर खावी। धरावें जीवीं हे नीट ॥"

"श्री साई" काय बोलतात याचा अर्थ त्या माईला कसा कळणार? "सर्वांभूतीं मी राम" हें तत्त्व तिला कसें समजणार? तेव्हां त्या बाबांना विचारतात, 'बाबा मी आपणांला जेवूं घालीन हें शक्य तरी आहे का? मीच येथें परतंत्र असून मिळेल तेथें खातें.' त्यावर बाबा म्हणतात. 'सेवूनियां तीं प्रेमाची भाकर। जाहलों मी तृप्त निर्भर। अजून मजला येती ढेंकर!। तूं जेऊं बैसतां द्वारीं येतां। पोटीं क्षुधेची जया व्याकुलता। त्यां देखिलें ज्या श्वाना अवचिता। मंज एकात्मता तयां सर्वें ॥'

'पाही भूतमात्रीं जो मंज। तोचि माझिया प्रीतीचा समज। तरी तूं भेदबुद्धीतें त्यंज। ऐसीच भज मजलागीं ॥ वचन नव्हे तें परमामृत। ऐकुनि बाई सद्गदीत। नेत्र आनंदाश्रुभरित। कंठ दाटत बाष्पही ॥' बापरखुमादेवीवरू जीवींचा जिव्हाळा। कांहीं केल्या वेगळा न होय गे माये ॥ असें जे श्री संतमुकुटमणि ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात तो जीवींचा जिव्हाळा म्हणजे श्री साई–विठू होय!

---

ज्याला भंक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें आणि अभेदाचें वेड बाळगल्यावांचून चालणार नाहीं........

# ज्ञा न भ क्ति

: लेखक :

ना. वा. गुणाजी

बेळगांव

(१) यो ऽ न्यां देवतामुपास्ते ऽ न्यो ऽ सावन्यो ऽ हमस्मीति न स वेद, यथा पशुरेव स देवानाम् ॥

—बृहदारण्यक उपनिषत्–१–४–१०

जो (ब्रह्माहून व्यतिरिक्त) इतर देवतेची–'ती देवता वेगळी आणि मी वेगळा–' अशा प्रकारें उपासना करतो, तो (तत्त्व) जाणत नाहीं; तो देवांचा बैलच होय.

(२) भेदभावनात्सो ऽ हमित्यसौ
भावना ऽ भिदा पावनी मता ॥ ८ ॥

—श्रीरमणभगवान्कृत—उपदेशसार.

भेदभावनेच्या ध्यानापेक्षां–ध्येय म्हणजे ईश्वर–तो मीच आहें अशी अभेद भावना पवित्र (व उत्तम) आहे.

श्री साईलीलेच्या जानेवारी–फेब्रुवारी–मार्च १९५३ च्या (वर्ष ३०–अंक १) अंकांत विद्वद्रत्न डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर, पीएच्. डी. यांचा '**भक्ति**' या विषयावर लेख प्रसिद्ध झाला आहे. लेखाच्या शेवटच्या परिच्छेदांत त्यांनीं आपल्या लेखाचा निष्कर्ष अथवा सिद्धान्त असा काढला आहे कीं:—

" 'यद्यपि भेदापगमे नाथ तवाहं' असें श्रीमदाद्यशंकराचार्य म्हणतात आणि म्हणून ईश्वराशीं सेव्य–सेवक भावानेंच शरण जातात, त्याच्यावर निस्सीम प्रेम करतात, त्याची भक्ति करतात. त्यावेळीं ब्रह्मज्ञान ते बाजूला ठेवतात. तेव्हां ज्याला भक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें आणि अभेदाचें वेड बाळगून चालणार नाहीं. (हा सिद्धान्त लेखाच्या आरंभीं मोठ्या टाईपांत प्रसिद्ध केला आहे.) हें वेड म्हणजे भक्तिमार्गांतील सर्वांत मोठा आत्मघातकी दोष आहे. तो भक्तानें सोडला पाहिजे."

यांनीं काढलेला हा निष्कर्ष किंवा सिद्धान्त आम्हाला अपसिद्धांत वाटतो आणि आमच्या मतें हा सिद्धांत असा मांडला पाहिजे कीं :—

**ज्याला भक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें आणि अभेदाचें (सगुण निर्गुण एकमेवाद्वितीय परमात्म्याचें) वेड बाळगल्यावांचून (वेड लावून घेतल्याशिवाय) चालणार नाहीं. हें वेड (अथवा प्रेम) म्हणजे भक्तिमार्गांतील मोठा आत्मघातकी दोष नसून उलट मोठा गुण आहे आणि तो भक्तानें संपादन केला पाहिजे.**

सदर लेखांतील इतर विधानें सोडून देऊन या मुख्य सिद्धान्ताविषयीं आतां आपण विवेचन करूं.

'यद्यपि भेदापगमे नाथ तवाहं' असें श्री शंकराचार्य 'षट्पदि' स्तोत्रांत म्हणतात हें खरें आहे. पण हें स्तोत्र शंकराचार्यांचें आहे कीं नाहीं याविषयीं शंका आहे, कारण श्रीशंकराचार्य कोणत्याहि आपल्या अधिकृत ग्रंथांत देवाची प्रार्थना किंवा याचना करतात असें दिसत नाहीं. तरी हें स्तोत्र श्रीशंकराचार्यांचें आहे असें आपण गृहीत धरूं. 'यद्यपि भेदापगमे नाथ तवाहं'–म्हणजे 'हे नाथ, जरी भेदभाव नाहींसा झाला, तरी मी तुझा आहे' या विधानाबद्दल आमची तक्रार नाहीं. पण त्यानंतरचा भाग–'म्हणून ईश्वराशीं **सेव्य–सेवकभावानेंच** शरण जातात, त्याच्यावर निस्सीम प्रेम करतात, त्याची भक्ति करतात' इत्यादि उल्लेख सदर स्तोत्रांत अगर इतर ग्रंथांत नाहीं; पण हेंहि आम्हीं मान्य करूं. परंतु त्याचे पुढील वाक्य 'त्यावेळीं ब्रह्मज्ञान बाजूला ठेवितात' असा उल्लेख श्रीशंकराचार्यांनीं या स्तोत्रांत किंवा कुठेंच केलेला नाहीं. तेव्हां हे डॉ. पारनेरकर यांनीं काढलेलें अनुमान आहे आणि तें चुकीचें आहे.

ईश्वराशीं 'भेदापगमे' म्हणजे भेदभाव गेल्यावर श्रीशंकराचार्य सेव्य–सेवकभावानेंच शरण जातात असें डॉ. पारनेरकर लिहितात. **भेदभाव** नष्ट झाल्यावर शरण कसें जातात किंवा जावयाचें याची कल्पना डॉ. पारनेरकर यांना नाहीं. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं याचा खुलासा फार उत्तम रीतीनें केलेला आहे. भगवद्गीता, अ. १८ श्लोक ६९ यांतील 'सर्व धर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' यावर टीका करितांना ते म्हणतातः—

पै आपलेनि **भेदेंवीण**। माझें जाणिजे जे **एकपण**। तयाचि नांव **शरण**। मज येणें गा ॥१३९८॥ जैसें घटाचेनि नाशें। गगनीं गगन प्रवेशे। मज शरण येणें तैसें। ऐक्यु करी ॥१३९९॥ सुवर्णमणि सोनया। ये कल्लोळ जैसा पाणिया। तैसा मज धनंजया। शरण ये तूं ॥१४००॥ मजही शरण रिघिजे। आणि जीवत्वेंचि असिजे। धिग् बोली यिया न लजे। प्रज्ञा केवीं ॥१४०२॥ अगा प्राकृताही राया। आंगीं पडे जे धनंजया। तें दासिरूंही कीं तयां। समान होय ॥१४०३॥ मा मी विश्वेश्वर भेटे। आणि जीवग्रंथी न सुटे। हे बोल नको बोलंटे। कानीं लाऊं ॥१४०४॥ म्हणौनि **मी होऊनि मातें॥ सेवणें आहे आयितें**। तैसें करी हाता ये तें। शानें येणें ॥१४०५॥

या षट्पदि स्तोत्राच्या पहिल्या श्लोकांत श्री शंकराचार्य श्रीविष्णूकडे असें मागतात कीं:—

अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णाम्।
भूतदयां विस्तारय तारय संसारसागरतः ॥ १॥

हे विष्णो, माझा अविनय दूर कर, माझ्या मनाचें दमन कर, माझ्या विषयमृगतृष्णेचें शमन कर, माझ्या भूतदयेचा विस्तार कर आणि संसारसागरांतून मला तार.

श्रीशंकराचार्यांनीं अनेक सुंदर भक्तिपर स्तोत्रें–पदें रचिलेलीं आहेत. त्यांत आणि या स्तोत्रांत वर्णिलेली स्थिति त्यांचे अंगीं होती असें मानावयाचें कीं काय ? त्यांचे अंगीं अविनय होता, त्यांचें मन त्यांच्या ताब्यांत नव्हतें, विषयमृगतृष्णा त्यांना त्रास देत होती, त्यांचे अंगीं भूतदया नव्हती, इत्यादि गोष्टी खऱ्या मानावयाच्या काय ? 'हरि हा आनंदाचा कंद। उभा पुढें भक्तसखा गोविंद' या आणि 'करि अति त्वरा, घडि घडि घडि पळ पळजप अमृतधाम रामनाम धरुनि आदरा' इत्यादि सुरस पदांचे कर्ते श्री. विठोबा आण्णा दत्तरदार नांवाचे एक साधुकवि होऊन गेले. त्यांचें एक पद 'उत्तम जन्मा येउनि रामा गेलों मी वायां। दुष्ट पातकी शरण मी आलों सत्वर तव पाया' हें फार प्रसिद्ध आहे. या पदाच्या सहा चरणांत आपण किती तऱ्हांचीं अनेक मोठीं पातकें केलीं याचें सुंदर वर्णन आहे. ह्यावरून हा साधुकवि मोठा दुष्ट पातकी होता असें अनुमान काढणें हें चुकीचें होईल. या व इतर अनेक साधुसंतांनीं अशीं अनेक कवनें केलेलीं आहेत; तीं सर्वसाधारण भक्तांच्या आणि लोकांच्या भूमिकेवरून केलेलीं असतात. आत्मवर्णनात्मक काव्यें खेरीज करून इतर काव्यांत वर्णिलेली स्थिति त्यांच्या अंगीं लावणें किंवा जोडणें हें चूक होईल. श्री शंकराचार्यांनीं स्वतः ब्रह्मज्ञान बाजूला ठेविलें असें वर्णन या स्तोत्रांत किंवा इतर त्यांच्या स्तोत्रांत कुठेंहि नाहीं. तेव्हां त्यांनीं आपलें ब्रह्मज्ञान बाजूला ठेविलें असें कसें मानावयाचें आणि हा प्रकार केव्हां झाला असें समजावयाचें ? या उलट त्यांचें 'दशश्लोकी' नांवाचें एक स्तोत्र प्रसिद्ध आहे. त्या प्रत्येक श्लोकाचे शेवटीं **"तदेकोऽवशिष्टःशिवः केवलोऽहम्"** असा अद्वैतानुभवाचा स्पष्ट दहा खेपां उल्लेख आहे. तेव्हां श्री शंकराचार्य हे पूर्ण अद्वैती होते यांत शंका नाहीं; आणि तसेंच त्यांना इतर आचार्य व सर्व लोक मानतात. तेव्हां त्यांनीं 'ब्रह्मज्ञान स्वतः बाजूला ठेविलें' या चुकीच्या अनुमानाकरून काढलेला सिद्धान्त खरा कसा मानावयाचा ?

भक्तानें निर्गुणाचें आणि अभेदाचें म्हणजे निर्गुण ब्रह्माचें वेड लावून घेऊं नये, तो मोठा आत्मघातकी दोष आहे असें जेव्हां डॉ. पारनेरकर सांगतात तेव्हां त्यांचा कटाक्ष निर्गुण ब्रह्माच्या भक्तीवर किंवा ज्ञानावर आहे असें स्पष्ट दिसतें. हेंहि त्यांचें मत कसें चुकीचें आहे हें आपण पाहूं.

आमच्या शास्त्रग्रंथांत परमेश्वरप्राप्तीचे चार मार्ग सांगितले आहेत. (१) कर्म (२) भक्ति (३) योग आणि (४) ज्ञान. यांपैकीं भक्ति व ज्ञान या दोहोंविषयींच येथें प्रामुख्यानें विचार करावयाचा आहे.

भक्ति व ज्ञान यांचा संबंध असाः—

(१) भक्ति हें ज्ञानाचें साधन—कांहीं अद्वैती.

(२) ज्ञान हें भक्तीचें साधन—कांहीं द्वैती.

(३) ज्ञान आणि भक्ति हे स्वतंत्र मार्ग असें कांहीं समजतात, तर

(४) ज्ञान आणि भक्ति हीं एकच आहेत असें कांहीं मानतात.

## भक्तीची व्याख्या

भक्ति हें एक स्वतंत्र शास्त्र आहे. त्याचे प्रणेते श्रीनारदमुनि यांनीं आपल्या भक्ति-सूत्रांत भक्तीची व्याख्या अशी केली आहे कीं—

'साऽत्वस्मिन् परमप्रेमरूपा' ॥२॥

अर्थ—सा म्हणजे भक्ति ही, अस्मिन्, म्हणजे तो नव्हे तर (हृदयावर हात ठेवून) हा-हृदयांत वास करणारा परमात्मा याच्या ठायीं परम प्रेम असणें हेंच भक्तीचें रूप आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, भक्ति म्हणजे परमेश्वराविषयीं परम प्रेम; किंवा वेड (चांगल्या अर्थीं).

आतां परमेश्वराविषयीं थोडा अधिक खुलासा केला पाहिजे. डॉ. पारनेरकर आपल्या सिद्धान्तांत असें सुचवितात कीं, निर्गुणाचें आणि अभेदाचें वेड बाळगूं नये, सोडून द्यावें; म्हणजे निर्गुण एकमेवाद्वितीय ब्रह्मावर प्रेम करूं नये, तर साकार ब्रह्मावरच करावें. ही सूचना बरोबर नाहीं. कारण सूत्रांतील 'अस्मिन्' या शब्दानें परमेश्वराचा बोध होतो आणि तो परमेश्वर साकार निराकार, सगुण निर्गुण असा एकच आहे. 'तुज सगुण म्हणों कीं निर्गुण रे। सगुण निर्गुण एकु गोविंदु रे ॥ १ ॥ तुज आकारु म्हणों कीं निराकारु रें। आकारु निराकारु एकु गोविंदु रे ॥' असें श्रीज्ञानेश्वर म्हणतात. 'सगुण तेंचि साकार। निर्गुण हें निराकार। भिन्न नाहीं परस्पर। साकार।निराकार एकचि ॥' (श्रीसाई-सच्चरित अ. ११।१२) श्रीसाईबाबा नेहमीं आपल्या भक्तांना श्रीएकनाथमहाराजांचा 'भावार्थरामायण' हा ग्रंथ वाचावयास सांगत असत. त्या ग्रंथांतील मंगलाचरणाच्या प्रथम ओव्या पहा—'यालागीं जैसा असशी तैसियाशी। नमन साकार निराकारासी। तंव अंगत्व मुकलें अंगासी। भज्य भंजकांसी अद्वैत ॥' ही तिसरी ओंवी आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत बाराव्या अध्यायांत सगुण निर्गुण ब्रह्माची उपासना (एक जरा कठीण व दुसरी सोपी अशी) सांगितली आहे. निर्गुणाचें आणि अभेदाचें म्हणजे एकमेवाद्वितीय निर्गुण परमात्म्याचें वेड लावून घेऊं नका असें सांगितलें नाहीं.

सगुण असो वा निर्गुण असो परमेश्वर हा एकच आहे, त्याची भक्ति करावयाची हें ठरलें. आतां ती कशी करावयाची हें पाहूं. वरील भक्तीच्या व्याख्येंत सांगितल्याप्रमाणें परमेश्वरावर आपण परम म्हणजे मोठें प्रेम केलें पाहिजे. डॉ. पारनेरकरांसारखे कांहीं विद्वान् आणि कांहीं भक्त असें समजतात कीं, आपण परमेश्वराची सेव्यसेवकभावानें (म्हणजे भेदभावनेनें) उपासना केली पाहिजे. ही समजूत चुकीची आहे. या भेद-भावनेच्या उपासनेनें, फार झालें तर थोडेसें प्रेम उत्पन्न होईल, पण परम प्रेम किंवा

आवडी म्हणजे खरी भक्ति उत्पन्न होणार नाहीं; उलट भय उत्पन्न होण्याचा अधिक संभव. '**द्वितीयाद्वै भयं भवति** ( बृहदारण्यकोपनिषत् १–४–२ ) म्हणजे आपणाहून दुसरें म्हणजे भिन्न कांहीं असेल तर त्यापासून भय वाटतें असा श्रुतीचा सिद्धांत आहे. ' भासे जें द्वितीय। तेंचि दावी भय ' असें श्री टेंब्येस्वामी महाराज सांगतात. 'यदा ह्येवैष एतस्मिन्नुदरमंतरं कुरुते। अथ तस्य भयं भवति ' जेव्हां तो ब्रह्माचे ठिकाणीं (आपणापासून) अल्प जरी भेद पाहील तेव्हां त्याला भय आहेच असें समजावें असें तैत्तिरीयोपनिषत्कार सांगतात ( ब्रह्मानंदवल्ली २. ७ ). या लेखाच्या आरंभीं जो श्रुतीचा उतारा दिलेला आहे त्यांत असें सांगितलें आहे कीं, देवता वेगळी आणि मी वेगळा अशी जो उपासना करितो, तो खरें ( तत्त्वच ) जाणत नाहीं. वरील दुसऱ्या उताऱ्यांत श्री रमणभगवान् असें स्पष्ट सांगतात कीं, भेदभावनेच्या उपासनेपेक्षां अभेद्रभावना ( ध्येय म्हणजे ईश्वर मीच आहें अशी ) पवित्र उत्तम आहे.

परमेश्वरावर परम प्रेम करावयाचें तर तें, 'तो मीच आहें' या **अभेदभावनेनेंच शक्य** आहे. याविषयीं श्रुतिही एका सुप्रसिद्ध आख्यायिकेनें स्पष्ट उपदेश करीत आहे. बृहदारण्यकोपनिषदांत याज्ञवल्क्य मुनि आपल्या मैत्रियी भार्येला अंतिम संदेश सांगत आहे कीं:— " न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति, आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति। न वा अरे जायायै कामाय०००—पुत्राणां कामाय ०००—ब्रह्मण०००—क्षत्रस्य—० देवानां कामाय " देवा प्रिया भवन्ति, आत्मनस्तु कामाय—सर्वस्यं कामाय०००—(बृहदा. उप. ४–२–५ ) " हा सर्व भाग मुळांतूनच काळजीनें वाचावा आणि त्याचें मनन करावें. त्याचा सारांश थोडक्यांत याप्रमाणें:—

हे मैत्रियी, पतीच्या कामाकरितां पति भार्येला प्रिय वाटत नसतो, तर आपल्या स्वतःकरितां पति प्रिय वाटतो. भार्येच्या कामाकरितां पतीला भार्या प्रिय वाटत नसते, तर ती स्वतःकरितांच प्रिय वाटत असते. याप्रमाणेंच पुत्र, वित्त, ब्राह्मण, क्षत्रिय वर्ग, लोक, **देव**, भूतें आणि सर्व, हें सर्व त्यांचेकरितांच प्रिय वाटत नसून स्वतःकरितांच म्हणजे आत्म्याकरितांच प्रिय वाटत असतात. वामन पंडितानीं याचा थोडक्यांत सुंदर अनुवाद केला आहे, तो असाः—

पतिनिमित्त पती तुजला प्रिये।
प्रिय असें म्हणतं सहसा न ये।
परम आवड आपुलि आपणा।
वळख तूं तुज, **टाकुनि मीपणा** ॥ १ ॥
इतर ईश्वर मानिति त्या जना।
निजसुखार्थेचि कीं तदुपासना।
परम आवड आपुलि आपणा।
वळख तूं तुज, टाकुनि मीपणा ॥ २ ॥

प्रत्येकाचा अनुभवहि असा आहे कीं, या जगांत आपल्याहून दुसरें कांहीं आपणास प्रिय नसतें. आपली आपणास परम आवड असते. तेव्हां परमेश्वर तो मीच आहे अशी

अभेद भावना उत्पन्न झाल्याशिवाय आणि ती कायम टिकविल्याशिवाय परमेश्वराच्या ठिकाणीं आपलें परम प्रेम म्हणजे खरी भक्ति उत्पन्न होणार नाहीं, हा सिद्धान्त खरा आहे. आतां याविषयीं कांहीं संतांचे-विभुतींचे अनुभवहि आपण पाहूं.

( १ ) प्रथम श्रीशंकराचार्य याविषयीं काय म्हणतात पहा.

'शतश्लोकी' नांवाच्या आपल्या ग्रंथांत नवव्या श्लोकाचे शेवटच्या चरणीं ते असें सांगतात कीं—

'तस्मादात्मानमेव प्रियमधिकमुपासीत विद्वान्न चान्यत्.'

तस्मात् विद्वान् पुरुषानें सर्वापेक्षां अधिक आत्म्याचीच उपासना करावी, अनात्म्याची करूं नये.

( २ ) आतां ज्ञानदेवाकडे वळूं.

**भक्तीचे आणि भक्ताचे प्रकार**—भक्ति तीन, नऊ आणि अकरा प्रतींची आहे. आणि भक्त चार प्रकारचे ( नारदसूत्राप्रमाणें आणि भगवद्गीतप्रमाणें ) आहेत. ते चार म्हणजे आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी आणि ज्ञानी. याविषयीं श्रीज्ञानेश्वर काय म्हणतात तें ऐका.

( अ ) अध्याय ७

तेथ आर्त तो आर्तीचेन व्याजें। जिज्ञासु तो जाणावयालागीं भजे। तिजेनि तेणें इच्छिजे । अर्थसिद्धि ॥ मग चौथियाच्या ठायीं । कांहींचि करणें नाहीं । म्हणोनि भक्त एक पाहीं। ज्ञानिया जो ॥ १११ ॥ जेतया ज्ञानाचिये प्रकाशें। **फिटलें भेदाचें कडवसें** । मग **मीचि जाहाला समरसें** । आणि भक्तही तेवीचि ॥ ११२॥ ×× तैसें शरीरीं हन कर्में । तो भक्त ऐसा गमे ॥ **परी अंतरप्रतीतिधर्में । मीचि झाला** ॥ ११६॥ आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें । मी आत्मा ऐसें तो जाणे । म्हणऊनि मीही तैसेंचि म्हणें । उचंबळलासांता ॥ ११७॥

( ब ) अध्याय १०

म्हणोनि निःशंके येणें महायोगें । मज मीनले मनाचेनि आंगें । एथ संशय करणें न लगे । तो त्रिशुद्धि जाहला ॥ १०८ ॥ का जे ऐसें किरीटी । मातें भजे जो **अभेदा दिठी** । तयाचिये भजनाचे नाटीं । मीचि लाभे ॥ १०९ ॥ म्हणऊनि **अभेदें जो भक्तियोग** । तेथ शंका नाहीं नये खंग । करितां ठेला तरी चांग । तें सांगितलें पर्थी ॥ ११० ॥

( क ) अध्याय १४

न उकलितां पट । तंतूचि असे स्पष्ट । न विरवितां घट । मृत्तिका जैंवी ॥ ३८० ॥ म्हणोनि विश्वपणें जावें । मग तैं माते घेयावें । तैसा नव्हे आघवें । सकटचि मी ॥ ३८१ ॥ ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति म्हणिजे । येथ भेद कांहीं देखिजे । तरी व्यभिचार तो ॥ ३८२ ॥ या कारणें भेदांतें । सांडूनि **अभेदें चित्तें** । आपण यासकट मातें । जाणावें गा ॥ ३८३ ॥

( ड ) अध्याय १८

इया **ज्ञानभक्ति** सहज । भक्त एकवटला मज । तो मीचि केवळ हें तुज । श्रुत ही आहे ॥ ११३० ॥ जे उभऊनिया भुजा । **ज्ञानिया तो आत्मा माझा** । हें बोलिलों

कपिध्वजा । सप्तमाध्यायीं ॥ ११३१ ॥ ते हे कल्पादि भक्ति मिया । श्रीभागवतमिषें ब्रह्मया । उत्तम म्हणोनि धनंजया । उपदेशिली ॥ ११३२॥ ज्ञानी इयेतें स्वसंवित्ति ॥ शैव म्हणती शक्ति । आम्हीं परम भक्ति । आपुली म्हणों ॥ ११३३ ॥

(इ) अध्याय १८

तरंग सर्वांगीं तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबी । नाना अवकाश नभीं । लुंठत जैसा ॥११४८॥ तैसा रूप होऊनि माझें । मातें क्रियावीण तो भजे । घनाकार का सहजें । सोनयातें जेंवी ॥११४९॥ कां चंदनाची ह्रुती तैसी । चंदनीं भजे अपैसी । का अकृत्रिम शशीं । चंद्रिका ते ॥ ११५० ॥ तैसी क्रिया फीर न साहे । तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे । ते अनुभवाचि जोगें, नव्हे । बोला ऐसें ॥ ११५१ ॥

(ई) ज्ञानेश्वरकृत अमृतानुभव, प्रकरण नववें

पाहे पां आघवया । रुखा रुखचि यया । परी दुसरा नाहीं तया । विस्तार जेंवी ॥४२॥ देव देउळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरू । तैसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा ॥४३॥

अर्थ—पहा कीं वृक्षाच्या सर्व डाहळ्यामध्यें सर्वत्र एक वृक्षच, दुसरा कशाचाच विस्तार तेथें नसतो; (४२) किंवा कोरींव लेण्यमध्यें जसा एखादा डोंगर पोखरून त्यांत त्याचेच अंगीं देव, देऊळ व पुजारी वगैरे चित्रें खोदून ठेवितात, त्याप्रमाणें एक देवच येथें सर्व भक्तीचा प्रकार बनून राहतो. ४३ ॥

॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

# बॉम्बे सिल्व्हर शॉप

टेलिफोन : २६१६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

गिरगांव मांगलवाडी
श्री धूतपापेश्वर प्रासाद
मुंबई नं. ४

चा. गो. जुवेकर
मालक

**श्रीएकनाथः**—आतां श्री एकनाथांचें म्हणणें पाहूं:

(अ) अभेद भजनाचा हरीख। देव भक्त झाले एक ॥

—अभंग २०२५

(ब) भगवद्भावो सर्वांभूतीं । हेंचि ज्ञान हेंचि भक्ति ॥

—अभंग २०९८

(क) जो मृत्यु ब्रह्मयाचा ग्रास करी । हरिहरां मृत्यु मारी । मृत्यु दुर्जय संसारीं। सुरासुरीं कांपिजे ॥ २२२ ॥ त्या मृत्यूचें खणोनि खत । पाडूनि कळिकाळाचे दांत । अद्वय भजनें माझे भक्त। सुखें नांदत संसारीं ॥२२३॥ एकनाथी भागवत, अध्याय २९

(ड) तंवीं जंववरी दृढ अज्ञान । तंवचि वेदाज्ञा प्रमाण । ज्यासी माझें अभेद भजन । तयासी वेद आपण स्वयें वंदी ॥ २९० ॥ —ए. भागवत. अ. २९

(इ) माझिया भक्तांचिये संगतीं । साधकां लाभे माझी भक्ती । अभेद भजनें माझी प्राप्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ३७४ ॥ —ए. भागवत. अ. २९

**श्रीसमर्थ रामदास स्वामी**—यांचें म्हणणेंहि पाहूं:

आत्मा येक स्वानंदघन । आणि अहमात्मा हें वचन । तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ॥ १५॥ आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य । अनन्य म्हणजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ॥ १७ ॥ आत्मा म्हणिजे तो अद्वैत। जेथें नाहीं द्वैताद्वैत ॥ तेथें मीपणाचा हेत । उरेल कैंचा ॥ १८ ॥

(आत्मनिवेदन भक्ति—दासबोध, दशक ४, समास ९)

आणखी इतर साधुसंतांचे पुष्कळ उतारे देतां येतील. पण इतके पुरे. आतां शेवटीं श्रीरमणभगवानांचा अभिप्राय देऊन हें संपवूं.

ज्ञान आणि भक्ति यामध्यें काय संबंध आहे, असा एका शिष्यानें प्रश्न केला असतां श्रीरमणभगवान् म्हणाले—

'आत्म्यामध्यें शाश्वत अखंड सहज असा वास म्हणजे निष्ठा हें ज्ञान-आत्म्यामध्यें वास करणें (निष्ठा) म्हणजे आत्म्यावर प्रेम पाहिजे. ज्याअर्थीं परमात्मा हा खरोखर आत्माच आहे, त्याअर्थीं आत्म्याची प्रीति म्हणजे परमात्म्याची प्रीति होय; आणि ही भक्ति. म्हणून ज्ञान आणि भक्ति हीं दोन्हीं एकच आहेत."

दुसऱ्या एका ठिकाणीं श्रीरमणभगवानांनीं कर्म, भक्ति, योग आणि ज्ञान यांचा सुंदर समन्वय केला आहे. तो असाः "हृदयाचि म्हणजे आपल्या आत्म्याचे ठिकाणीं मन स्वस्थ करणें हाच कर्ममार्ग, भक्तिमार्ग, योगमार्ग आणि ज्ञानमार्ग होय असें निश्चितपणें समजावें."

ॐ नमो भगवते श्रीसाईरमणाय।

# वाचकांचे विचार

श्री. गजानन वि. गोखले, नवें सोमण-सदन, केनेडी पूल, मुंबई, हे लिहितात :—

एप्रिल महिन्यांत मीं दि. ४ रोजीं 'श्रीसाईलीला' रामनवमी विशेषांक विकत घेतला. त्यांतील 'भक्ति' हा डॉ. पारनेरकर यांची लेख मोठ्या उत्सुकतेनें वाचला. [त्यांचीं प्रवचनें मुंबईत नुकतींच झालीं होतीं, त्यामुळें त्यांच्याविषयीं माहिती मिळालेली होती.] परंतु त्या लेखांतील कांहीं विपर्यस्त विधानांनीं मनांत खळबळ सुरू झाली व पुनः तो लेख वाचला आणि माझी खात्री झाली कीं सर्व-सामान्य धार्मिक दृष्टीच्या माणसांना वाचनीय असें उद्दिष्ट ठेवणाऱ्या मासिकांत आपण अशीं वादग्रस्त विधानें, त्यासंबंधीं कोणताहि खुलासा अगर टीप न देतां छापलीं आहेत. त्याबद्दल एक सामान्य जिज्ञासू वाचक या नात्यानें नापसंती व्यक्त करणें अवश्य आहे. मी तपस्वी रा. कृ. कामत यांच्या 'नाम-चिंतामणि' या पुस्तकाच्या वाचनानें मिळालेल्या स्फूर्तीनें दि. ३०–१०–५२ पासून नामस्मरण, चिंतन, मनन या मार्गाकडे वळलों. तपस्वी कामतांनीं आपल्या पुस्तकांत 'थोडासा वेदान्त' या ६६ पानांच्या प्रकरणांत भक्तीला अद्वैत ज्ञानाच्या पाठिंब्याची कशी आवश्यकता आहे हें सप्रमाण मांडलें आहे. असें असतां श्री पारनेरकर हे "ज्याला भक्तिमार्गाचा अवलंब करावयाचा असेल त्यानें निर्गुणाचें आणि अभेदाचें वेड बाळगून चालणार नाहीं. हें वेड म्हणजे भक्तिमार्गांतील सर्वांत मोठा **आत्मघातकी दोष** आहे" अशीं **बेफाट विपर्यस्त विधानें करतात** याचें आश्चर्य वाटतें. निर्गुणज्ञान आणि अभेदानुभव यांची लेखक **वेडांत** गणना करतात व पुढें तो आत्मघातकी दोष असा जो त्यावर शेरा मारतात त्यासंबंधीं अधिकारी विद्वानां-कडून जास्त उहापोह होणें अतिशय आवश्यक आहे असें मला सुचवावेंसें वाटतें. डॉ. पारनेरकरांनीं असें लिहिलें असतें कीं भक्तानें 'भक्तिसांप्रदायांत ज्ञानोत्तर भक्तीच्या स्थितींत निर्गुणाचें ज्ञान व अभेदानुभव यांची उजळणी ठेवण्याचें कारण नाहीं आणि भक्तीचें शास्त्र न समजतांहि भाबडेपणानें पण शास्त्रदृष्ट्या निर्दोष अशी भक्ति केल्यानें देवकृपा होत असल्यामुळें निर्गुणज्ञान व अभेदानुभव यांचा अवलंब न करतांहि भक्ता-वर देवकृपा होईल' तर मीं त्यासंबंधीं नापसंती व्यक्त केली नसती.

# संतांचिया गांवीं

: लेखक :
मधुकर द. जोशी,
साहित्यप्राज्ञ

पुन्हां न येणारा, अतिशय बहुमोलाचा, सर्वश्रेष्ठ असा हा मानवजन्म आहे. या मानवजन्मांत येऊन परोपकार, ईश्वरसेवा जर झाली नाहीं तर जन्म-सार्थक झालें नाहीं, असें सर्वसाधारण आपण मानतो. ईश्वर हा आपल्यापाशींच आहे, तूं स्वतःच ईश्वर आहेस, पण अज्ञानामुळें ते आपणांस कळूं शकत नाहीं; 'अहं ब्रम्ह' वगैरे सारे संतविचार आपण ऐकतो. पण सर्वांत मानवाला प्रपंच करून परमार्थ कसा साधतां येईल ? याला मार्ग कोणते ? संत कोण ? वगैरे प्रश्न मोठे विचार करण्याजोगते आहेत. संत आपणांस काय दाखवितात ?

संत हे आपल्या भक्तीनें ईश्वराचें अस्तित्व फक्त दाखवून देत असतात. तें दाखविण्यासाठीं संत आपल्या पूर्ण भक्तीच्या जोरावर कांहीं चमत्कार पण करून दाखवीत असतात. त्या चमत्कारावर आपण विश्वास ठेवीत नाहीं.' ज्ञानेश्वरानें निर्जीव भिंत चालविली, रामदास स्वामींनीं मेलेली घार जिवंत केली, श्रीसाईबाबांनीं पाणी घालून समया जाळल्या' असे अनेक संतचमत्कार आपण ऐकतों. पण यांची हसून टिंगल करणाऱ्या सुशिक्षितांना माझ्या अल्पबुद्धीनें मी असें उत्तर देतो कीं 'पाण्याच्या प्रवाहाचा गुणधर्म काय ?' ज्या बाजूस उतार असेल त्या बाजूस वाहात जाणें, हे साधें उत्तर आहे. प्रवाहाचा उताराकडेच वाहात जाण्याचा गुणधर्म असला तरी उंच ठिकाणीं ( माडीवर चढावर ) मनुष्य आपल्या शास्त्रीय शोधांच्या साह्यानें, नळाच्या साह्यानें आणि इतर साधनें वापरून तो तें पाणी हवें तसें कोठेंही नेऊं शकतो. तर मग संत हे आपल्या पूर्ण भक्तीच्या जोरावर आपल्या योगसामर्थ्याच्या बळावर मानवाला ईश्वरभक्तीचा चटका लावण्यासाठीं ते निरनिराळे चमत्कार का करून दाखविणार नाहींत ? नेहमीं विश्वास ठेवला पाहिजे. विश्वासाशिवाय आपणांस कोणतीही गोष्ट करतां येणार नाहीं. 'मला आगींत टाका. माझ्या देहाचें वाटेल तें करा; पण हे परमेश्वरा मला तूं हवास' असें आळवून म्हणणाऱ्या भक्त प्रल्हादासाठीं देव हा धांवून आलाच ना ?

भक्तीसाठीं अगर भक्तीच्या मार्गाला लागण्यासाठीं संत-संगतीची जरूरी लागते, चांगली संगति लागते. तुकाराम महाराज म्हणतात 'नलगे मुक्ति धन संपदा, संतसंग देई सदा'. चांगली संगत असल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य करतां येणार नाहीं. ती सत्संगती मिळविण्यासाठीं पुष्कळजण संतांच्याकडे जातात, संतांच्या गांवाला वाऱ्या करतात. पण ती त्यांना मिळत नसते, कारण मन तयार नाहीं. संशयभाव कायम रुतलेला असतो, विश्वासाचा संपूर्ण अभाव असतो. असें जर असेल तर संत जवळ असले तरी

काय उपयोग ? तेवढ्यापुरतें त्याला चांगलें वाटतें, आपला आतां नक्कीच उद्धार होईल असा वृथा भ्रम होतो. संतांच्या गांवांत काय आहे. तुकाराममहाराज म्हणतात—


' संतांचिया गांवीं प्रेमाचा सुकाळ । नाहीं तळमळ दुःखलेश ॥ १ ॥
तेथें मी राहीन होऊन याचक । घालतील भीक तेचि मज ॥ २ ॥
संतांचिया गांवीं वसे भांडवल । अवघा विठ्ठल धनवित्त ॥ ३ ॥
संतांचें भोजन अमृताचें पान । करिती कीर्तन सर्वकाळ ॥ ४ ॥
संतांचा उदीम उपदेशाची पेठ । प्रेमसुख साठ देती घेती ॥ ५ ॥
तुका म्हणे नाहीं आणिक परि कांहीं । म्हणून भिकारी झालों त्यांचा ॥ ६ ॥

हें सारें संतांच्या गांवांत आहे.


माणूस आपली भक्तीविषयींची इतिकर्तव्यता जाणूं शकत नाहीं, त्यावर विचार करूनही पण तो त्यावर विश्वास ठेवण्यास तयार होत नाहीं, ह्याला सर्वस्वीं तोच जबाबदार आहे. कांहीं चांगलें झालें कीं त्याचें श्रेय आपल्या स्वतःवर घ्यावयाचें व कांहीं वाईट झालें कीं 'ईश्वरांला एवढेंसुद्धां पाहविलें नाहीं ना ?' असें म्हणून ईश्वरावर दोष द्यावयाचा ही मनुष्याची वृत्ति आहे. 'आमची गाडी चुकली म्हणून आम्ही स्टेशना-वरून परत आलों;' वास्तविक गाडी वेळेवरच सुटलेली असते, हा चुकलेला असतो, पण आपली चूक त्या वेळेवर सुटलेल्या आगगाडीवर घालून स्वतःला निर्दोष म्हणून समजतो. अगदीं साधेंच उदाहरण आहे. पण यांतून मनुष्यस्वभावाची चांगलीच पारख होते, जेवढें वाईट आहे तेवढें अगदीं लवकर ग्रहण करतां येतें, पण त्याबरोबरच जें चांगलें आहे तें आपल्याजवळचें तो घालवून बसतो.

ईश्वरानें आपणांस दोन कान दिले आहेत. उजव्या कानानें चांगलें वाईट सारें ऐकावें. जें चांगलें आहे तें हृदयांत गाळून त्यांचा साठा करावा व जें वाईट आहे तें डाव्या कानानें सोडून द्यावें.

संतांच्या गोष्टी ऐकण्यांत सुद्धां केवढा मोठा आनंद मिळत असतो, तर मग प्रत्यक्ष संतसमागम मिळाल्यावर काय होत असेल ? रंगनाथस्वामींनीं आपल्या एका भक्तास रामदास स्वामींजवळ, 'माझ्या आणि तुमच्या भेटींतला आनंद मागण्यास' सांगितला. आतां आनंद ही काय वस्तु आहे म्हणून ती रामदासस्वामींनीं त्या ब्राह्मणास द्यावी ! पण ही शाश्वत वस्तु देण्यासाठीं, त्याला दिव्य दृष्टि, दिव्यज्ञान, पूर्ण भक्ति, संतकृपा जवळ असावी लागते; ती त्याला प्रथम दिली पाहिजे. संतापाशीं लीन बुद्धीनें 'आनंद' मागितला पाहिजे. त्या आनंदांतूनच 'ब्रह्मानंद' आपोआप मिळत असतो. आणि एकदां का या ब्रह्मानंदाची प्राप्ती झाली कीं सारें एक दिसूं लागतें. द्वेष, आपपर भाव, वैर हें समूळ नाहींसें होऊन त्या ठिकाणीं, प्रेम, भूतदया क्षमा, शांती यांचा शिरकाव होऊं लागतो; मन शुद्ध आणि प्रेमळ बनतें. आणि



लिंबवृक्ष व गुरुपादुका स्थान
[ फोटोग्राफ –श्री. जी. जी. वेलींग, पुणें



लैंडी बागेंतील श्रीबाबांचें निवांतस्थान
[ फोटोग्राफर–श्री. जी. जी. वेलींग, पुणें ]

त्यापासूनच ईश्वराचा साक्षात्कार होऊं लागतो, आणि मग मी स्वतःच ईश्वर आहे असें कळूं लागतें. स्वामी रामकृष्णपरमहंस यांना हें जेव्हां कळलें त्यावेळीं त्यांनी आपल्या स्वतःची पूजा स्वतः केली. देहभान विसरून जाऊन जिकडे पहावें तिकडे त्यांना दैवच दिसत होता. एकदां या आत्मसाक्षात्काराची प्राप्ती, कृपा झाली कीं तो संत संत म्हणून समजला जातो, व त्यापासून तो दुसऱ्यासही आनंद देत असतो.

आपल्या देहाचा भरंवसा आपणांस देतां येत नाहीं. म्हणून संतांनीं दाखविलेल्या अनुभवाच्या दिव्याच्या प्रकाशानें आपण आपल्या देहाचें सार्थक करून घेतलें पाहिजे. संतापासून भक्तीचा मार्ग चोखळला पाहिजे. अभिमानाचा समूळ नाश करून देहवृत्ति आवरून, मन स्थिर करून ईश्वरासाठीं कमींत कमी दहा मिनिटें देण्याचें ठरविलें तरी कांहीं वर्षानंतर आपोआप कळून येईल कीं आपलें आयुष्य हें परोपकार, सेवा, भक्ती, यासाठींच आहे. बस! एवढें कळलें तरी मानवाचा चाललेला ऱ्हास पुष्कळच प्रमाणांत आपोआप घटला जाईल.

शेवटीं श्रीसाईबाबांच्या चरणीं एवढीच प्रार्थना—

‘ सुखी सारे असावेत । निरोगी सर्वही तसे<br>
सर्वांचें चांगलें होवो । न होवो दुःख तें कुणा ’

* त्याग हा सदैव मनांत असतो. अरण्यवास केला, एकान्तांत जाऊन राहिलें, आपलीं कर्तव्यकर्में सोडून दिलीं तरी तेवढ्यानें त्याग सिद्ध होत नाहीं. मुख्य गोष्ट आहे ती ही कीं, मन हें बहिर्मुख न होतां अंतर्मुख झालें पाहिजे.

—रमणमहर्षि

* आपण खातों किती यापेक्षां आपण पचवितों किती यांवर आपली शक्ति अवलंबून आहे. उपदेश बोलून दाखविण्यापेक्षां आपण तो आचरणांत किती आणतों यांवर आपली दानत अवलंबून आहे.

—लॉर्ड बेकन


॥ श्री साईनाथ ॥

आमच्या येथें सर्व प्रख्यात कंपन्यांचीं स्टेनलेसचीं भांडीं व प्रेझेंटेशन आर्टीकल्स्, तसेंच बाबा ट्रायसीकल, पायडलकार, कॉटस् व पाळणेही मिळतात.

अरविंद सायकल स्टोअर्स

जीवा देवसी निवास, रानडे रोड, दादर, मुंबई २८.




## फेब्रुवारी व मार्च १९५३

या दोन महिन्यांत श्रींचे दर्शनास येणाऱ्या बाहेरगांवच्या भक्तांची रीघ नेहमीं-प्रमाणेंच चालू होती. अनेक भक्तांकडून श्रींस देणग्या व वस्तू अर्पण करण्यांत आल्या. लघुरुद्र, अभिषेक, पूजा आरती, अर्चन, नैवेद्य, अन्नदान वगैरे धार्मिक विधि संस्थान-तर्फे यथासांग केले गेले.

## गायन, कीर्तन वगैरेः—

श्री. पंडितराव नगरकर, श्री. सूर्यकांत व सौ. शैला मोहिले, श्री. उमेशचंद्र व सौ. नलिनी मुळगांवकर आणि श्रीमती विमलाबाई गव्हाणकर यांनीं श्रीपुढें गायनाची हजेरी दिली. ह. भ. प. लोहणेरकर, ह. भ. प. तुळसाबाई पवार व ह. भ. प. नीळकंठ-बुवा देशपांडे यांचीं कीर्तनें झालीं. चाळीसगांवच्या 'रघुवीर ब्रास बॅंडनें' श्रीपुढें बॅंडवादन केलें.

फेब्रुवारी महिन्यांत ह. भ. प. दत्तात्रय विनायक उर्फ दादामहाराज सबनीस यांचें श्रीज्ञानेश्वरीवर तीन दिवस सुंदर प्रवचन झालें. नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान–गवई यांचीं कीर्तनें झालीं.

## विशेष कार्यक्रमः—

फेब्रुवारी महिन्यांत महाशिवरात्रीनिमित्त श्रींस मंगलस्नान घालण्यांत आलें. रात्रौ पालखीची मिरवणूक निघाली व संस्थान–गवई यांचें श्रीपुढें कीर्तन झालें. तुकारामबीज व एकनाथषष्ठी हे दिवस संस्थानतर्फे साजरे करण्यांत आले.

मार्च महिन्यांत चैत्र शुद्ध प्रतिपदेस श्रींस मंगलस्नान घालण्यांत येऊन मंदिरावर गुढी उभारण्यांत आली. संध्याकाळीं रथाची मिरवणूक निघून रात्रौ संस्थान–गवई यांचें कीर्तन झालें. रंगपंचमीनिमित्त श्रींच्या रथाची मिरवणूक गांवांतून काढण्यांत आली. त्यानंतर रामनवमीचा उत्सव झाला.

## श्रीक्षेत्र शिरडी येथील रामनवमी उत्सव

आधुनिक संतचूडामणि श्री सच्चिदानंद सद्गुरु साईनाथमहाराज, संस्थान शिर्डी यांचा श्री रामजयंती उत्सव दरवर्षीप्रमाणें चैत्र शु० ८ शके १८७५ रविवार ता० २२

मार्च १९५३ रोजीं चालू होऊन चैत्र शु० १२ शुक्रवार ता. २७-३-१९५३ रोजीं समाप्त झाला.

हा उत्सव नेहमीं ५ दिवसांचा असतो परंतु यंदा एक तिथी जास्त आल्यामुळें उत्सव ६ दिवसापर्यंत चालला. उत्सवास अधिकृत रीत्या ता. २२-३-५३ पासून सुरवात झाली; भक्त लोकांची गर्दी मात्र ४।५ दिवस अगोदरपासूनच जमूं लागली होती. तसेंच शिर्डीच्या परिसरांत मांड्यांचीं, खेळण्याच्या वस्तूंचीं, फोटो काढण्याचीं, मेवामिठाईचीं कापडांचीं इत्यादि नाना तऱ्हेचीं दुकानें थाटलीं गेल्यामुळें या उत्सवास एका फार मोठ्या जत्रेचें स्वरूप प्राप्त झालें होतें. तशांत संस्थानतर्फे मंदिरावर व इतर ठिकाणीं विजेच्या दिव्यांची सुंदर रोषणाई केल्यामुळें जत्रेस अपूर्व अशी शोभा प्राप्त झाली होती.

उत्सवांत नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त कांहीं तरी विशेष कार्यक्रम रोज होत असत. रविवार ता. २२-३-५३ रोजीं संध्याकाळीं ह. भ. प. अनंत दामोदर आठवले यांचें कीर्तन झालें व रात्रौ अनिलकुमार मोहिले यांचें काच-तरंग, तबलावादन व बांसरी-वादन झालें. दुसरे दिवशीं म्हणजे चैत्र शु० ९ स कांहीं उत्साही साईभक्तांनीं दरवर्षाप्रमाणें श्रीगंगा-गोदावरीच्या पाण्यानें भरलेल्या कावड्या आणल्या व नंतर त्यांची वाजत गाजत मिरवणूक काढून त्या सर्व श्रींच्या समाधीमंदिरांत आणल्या आणि नंतर त्या कावड्यांतील पाणी श्रींचे समाधीवर घालण्यांत आलें. कावड्यांची संख्या अंदाजें ५०० होती व त्यांत सर्व जातीच्या लोकांनीं व आबालवृद्धांनीं भाग घेतला होता. नंतर थोड्याच वेळांत श्रीरामनवमी जन्मोत्सवाचें कीर्तन झालें व त्यानंतर महा आरती होऊन सर्वांस तीर्थप्रसाद वांटण्यांत आला. संध्याकाळीं नेहमीप्रमाणें नवसाच्या दोन निशाणांची मिरवणूक निघाली. या दोन निशाणांपैकीं एक निशाण श्री. निमोणकरांचें असून दुसरें श्री. रासने यांचें आहे. मिरवणूक समाप्त झाल्यावर यापैकीं एक निशाण द्वारकामाईवर रोवण्यांत आलें व दुसरें समाधिमंदिरावर कळसाशेजारीं लावलें. त्यानंतर श्रींच्या रथाची मिरवणूक निघाली. रात्रौ शेजारतीचा कार्यक्रम झाला नाहीं. सुरवातीस कांहीं कलावंतांनीं गायन-वादनादि कार्यक्रम केले. नंतर मुंबईच्या श्रीदत्तराज कलामंदिराचा 'वाल्मीकि' हा नाट्यप्रयोग झाला. प्रयोग अतिशय उत्तम तऱ्हेनें वठवून कलामंदिरानें साईबाबांपुढें आपली सेवा सादर केली आणि त्याचबरोबर प्रेक्षकांकडून वाहवाही मिळविली. नंतर पुन्हां गायन, वादन, संगीत भजनादि कार्यक्रम होऊन श्रींचे मंदिरांत रात्रभर जागर करण्यांत आला.

मंगळवारीं दुपारीं कीर्तन झालें व रात्रौ कांहीं कलावंतांनीं आपापल्या कलेची हजेरी श्रींपुढें दिली. बुधवार ता. २५-३-५३ रोजीं श्री. श्रीपाद बाळकृष्ण देव यांचें कीर्तन झालें. श्री. नानासाहेब चांदोरकरांच्या मुलीच्या (मैनाताई) बाळंतपणाच्या प्रसंगावर आख्यान लावलें होतें. स्वतः श्री. देव यांना त्यांना नुकत्याच झालेल्या अप-घातांत श्रीसाईबाबांच्या कृपेचा प्रत्यय आल्यामुळें, आख्यान सांगतांना ते एका अननुभूत भावनेनें रंगून गेले होते व त्यामुळें ते स्वतः कीर्तनकार नसतांही त्यांचें कीर्तन फारच बहारीचें झालें.

गुरुवारीं ह. भ. प. तुकारामबोवा आजगांवकर यांचें सुश्राव्य कीर्तन होऊन रात्री चावडीचा व पालखीचा कार्यक्रम झाला. त्याबरोबरच गारुड झालें (गारुड–ललिता सारखा एक प्रकार) या गारुडांत संस्थानच्या नोकरवर्गानें व जमलेल्या भक्तगणांनीं उत्साहानें भाग घेतला होता. शुक्रवार ता. २७–३–५३ रोजीं ह. भ. आठवले यांनीं गोपाळकाल्याचें कीर्तन केल्यावर अनेक भक्तजनांनीं झिम्मा, फुगड्या वगैरे खेळ खेळून दहीहंडी फोडली व नंतर गोपालकाल्याचा प्रसाद सर्वांना वांटण्यांत येऊन उत्सव समाप्त झाला.

आणखी कांहीं विशेष गोष्टी म्हणजे संस्थानतर्फे उत्सवाचे दिवसांत श्रींच्या कपड्यांची व इतर वस्तूंची प्रसाद म्हणून विक्री करण्यांत आली. कुस्त्यांचा हंगामा होऊन विजयी वीरांना संस्थानतर्फे बक्षिसें वांटण्यांत आलीं. तसेंच निरनिराळ्या कलावंतांचीहि योग्य संभावना संस्थान कमिटीतर्फे करण्यांत आली.

या उत्सवाकरतां मुंबई, पुणें, मद्रास, बंगलोर, हैद्राबाद, नांदेड, मुखेड, पंढरपूर, नाशीक, नौसारी, अहमदाबाद, सौराष्ट्र, नागपूर इत्यादि लांबलांबच्या ठिकाणाहून बरेच भक्तगण आले होते. तसेंच आजुबाजूच्या खेड्यापाड्यांतूनही फार लोक आले होते. अंदाजें २० ते २५ हजार भक्तगण आले असावेत असें बोललें जातें. गांवांतील कांहीं घरें घेऊन व एक मोठा मांडव घालून कमिटीनें अनेक भक्तांच्या राहण्याची सोय केली होती. स्वयंस्फूर्तीनें स्वयंसेवकाचें काम करून व्यवस्था ठेवण्याचे कामीं कांहीं साईभक्तांनीं कमिटीस आपुलकीनें मदत केली. पोलिस बंदोबस्त देखील उत्तम प्रकारें ठेवून पोलिसांनीं भक्तांशीं सहकार्य फारच उत्तम केलें. कोपरगांवहून कांहीं होमगार्डसुद्धी व्यवस्था ठेवण्यासाठीं मुद्दाम आले होते. त्यांनींही उत्तम तऱ्हेनें सहकार्य केलें. या उत्सावांत बसगाड्यांची व्यवस्था एस्. टी. नें उत्तम ठेवल्यामुळें बरीच गैरसोय दूर झाली.

अशा रीतीनें हा उत्सव श्रीसांईबाबांच्या कृपेमुळें व भक्तांच्या सहकार्यामुळें मोठ्या आनंदांत पार पडला.

आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

चष्म्यांचें व्यापारी

मुख्य दुकान : २०७ गिरगांव रोड, मुंबई ४

शाखा : [१] चामार बाग रोड परळ, मुंबई १२.

[२] मुकुंद मॅनशन न. चि. केळकर रोड, दादर, मुंबई २८

# एप्रिल १९५३

या महिन्यांत श्रीचे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची गर्दी फार मोठ्या प्रमाणांत होती. अधिक मासांत क्षेत्राच्या ठिकाणीं पुण्यकर्म केल्यास त्याचें फार मोठें फळ मिळतें असें पुराणांत सांगितलें आहे. या महिन्यांत अधिक वैशाख आला होता त्यामुळें व उन्हाळ्याच्या सुट्टया आणि रेल्वेच्या शताब्दि उत्सवानिमित्त तिकिटांच्या दरांत सवलती या सर्वांचा जणूं कांहीं त्रिवेणी संगमच झाला होता व त्याचा फायदा अनेक भक्तांनीं घेतल्यामुळें गर्दीचें प्रमाण फार वाढलें होतें. संस्थानतर्फें या सर्व भक्तांची राहण्याची वगैरे सोय शक्य तों चांगल्या रीतीनें करण्यांत आली.

## देणग्या, धर्मकृत्यें

या महिन्यांत अनेक भक्तांनीं श्रींस देणग्या अर्पणा केल्या. अर्पण केलेल्या वस्तूंचें प्रमाण फार मोठें होतें. अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, नैवेद्य वगैरे भक्तांचे धार्मिक विधीही या महिन्यांत फार मोठ्या प्रमाणांत झाले व संस्थानतर्फें ते सर्व यथासांग पार पाडले गेले.

## नृत्य, गायन, वादन इ० :—

मुंबई येथील कलावंत जयसिंगभाई पार्टी व त्यांचे कुटुंबांतील मंडळी यांनीं सिनेमांत वाजवल्या जाणाऱ्या वाद्यांपैकीं पुष्कळशीं वाद्यें उ० इलेक्ट्रीक सतार, मॅंडोलीन, कांचतरंग, तंतुवाद्य वगैरे येथें आणलीं होतीं व तीं श्रींपुढें उत्तमरीतीनें वाजवलीं व भक्तांचेंही चांगल्या रीतीनें मनरंजन केलें. तसेंच कांहीं पाश्चात्य व भारतीय पद्धतीचें गायन व नाचही या पार्टीनें केलें. तसेंच मुंबईचे बहिरवदत्त जोशी व गोविंदराव निकम या पार्टीनें श्रींपुढें कथ्थक पद्धतीचें नृत्य करून दाखविलें.

यांशिवाय खालील कलाकार भक्तांनींही आपल्या कलेची हजेरी श्रीपुढें दिली.

**गायन**—सौ. मिराबाई हात्यंगडी, श्री. दत्तात्रय नारायण नाडकर्णी, सौ. चंद्रलेखा दत्तात्रय राजाध्यक्ष, श्री. नारायणबोवा पटवर्धन, श्री. कृष्णराव चोणकर, सौ. इंदुमती चौबळ, व श्री. लक्ष्मणराव पुराणिक

श्री. वासुदेव विश्वनाथ साठे—फिडल–वादन

श्री. माधवराव शंकरराव अळकुटकर—पखवाज–वादन

श्री. श्रीपादराव नागेशकर व श्री. सुरेश मूळगांवकर—तबला–वादन

**कीर्तन** : नेहमींप्रमाणें एकादशीस संस्थान–गवई यांचीं कीर्तनें झालीं. बाहेरगांवच्या भक्तांपैकीं सौ. राधाबाई दामोदर साठे यांचें कीर्तन झालें.

## विशेष कार्यक्रम :

श्रीसाई महाराजांचे एक निस्सीम भक्त व वैराग्यमूर्ती भाऊमहाराज कुंभार यांची पुण्यतिथी कांहीं भक्तांनीं ११।४।५३ रोजीं साजरी केली. त्याचप्रमाणें अक्कलकोटस्वामींची

पुण्यतिथीही तारिख १२।४।५३ रोजीं साजरी केली. त्यानिमित्त श्रींपुढें गायनाचा विशेष कार्यक्रम करण्यांत आला.

**हवापाणी**—एप्रिल महिन्यांत उन्हाळ्याची तीव्रता जास्त प्रमाणांत भासूं लागली. पहिल्या आठवड्यांत हवा ढगाळी होती व अधून मधून पाऊस पडत असे—ता. ५।४।५३ रोजीं गारांचा पाऊस पडला. सध्यां मात्र हवापाणी उत्तम आहे. दुपारीं उन्हाळ्याचा त्रास जाणवला तरी रात्रीं हवा थंड असते व पहांटेस चांगलाच गारवा जाणवतो.

## मे १९५३

या महिन्यांत श्रींचे दर्शनास येणाऱ्या भक्त लोकांची गर्दी मागील महिन्यांपेक्षांही जास्त होती. नुसत्या गुरुवारींच नव्हे तर प्रत्येक दिवशीं जणूं कांहीं यात्रा लोटली आहे असें वाटे. गुरुवारीं तर अलोट गर्दी होत असे. हजारांनीं भक्तगण जमत. अधिकमास, शताब्दि महोत्सवानिमित्त रेल्वेनें काढलेली सवलतीच्या दराची तिकिटें व उन्हाळ्याच्या सुट्टया यांचा त्रिवेणी संगम जसा मागील महिन्याच्या गर्दीस कारणीभूत झाला तसाच तो या महिन्यांतील गर्दीसही कारण झाला. अनेक भक्तांकडून श्रींस देणग्या व वस्तु अर्पण करण्यांत आल्या. अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा वगैरे भक्तांचे धार्मिक विधी संस्थानतर्फे यथासांग पार पाडले गेले.

बऱ्याच कलाकार भक्तांनीं आपापल्या कलेची बाबांसमोर हजेरी दिली. कु. प्रेमा शिवलकर (वय १३।१४) हिनें ३ दिवस किर्तनाची हजेरी दिली. कु. विजयालक्ष्मी (वय ८।९) रास्ता पेठ, पुणें, हिचे श्रींपुढें नटराजन् नृत्य झालें.

अधिक वैशाख वद्य ११ स संस्थान गवई यांचे कीर्तन झाले. वैशाख शुद्ध ११ स (ता. २४–५–५३) ह. भ. प. डॉ. के. भा. गव्हाणकर यांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन झालें.

शिर्डीचें हवा पाणी उत्तम आहे.

द. ब. राणे
स. चिटणीस

## लेखकांसाठीं सूचना

(१) लेख पानाच्या एकाच बाजूला सुवाच्य अक्षरांत शाईनें लिहिलेला असावा. डाव्या बाजूला भरपूर मार्जिन सोडावी.

(२) लेख, कविता वगैरे साहित्य प्रसिद्धीकरितां स्वीकारणें किंवा न स्वीकारणें अगर त्यांत थोडाफार बदल करणें हा अधिकार सर्वस्वीं संपादकांचा आहे. न स्वीकारलेले लेख परत पाहिजे असल्यास पुरेसें पोष्टेज पाठवावें. नापसंत लेख तीन महिन्यांनंतर निकालांत काढण्यांत येतील.

(३) लेखकानें आपलें पूर्ण नांव व पत्ता कळवावा. टोपण नांवानें लेख प्रसिद्ध करावयाचा असला तरीही पूर्ण नांव व पत्ता ऑफिसच्या माहितीकरतां कळविणें जरूर आहे.

—संपादक

# — भक्तांस निवेदन —

'श्रीसाईबाबा संस्थान, शिरडी, या संस्थेच्या भक्तमंडळाच्या सभासदांना उद्देशून संस्थानचे मॅनेजिंग ट्रस्टी, श्री. ना. आ. सावंत यांनीं एक जाहीर निवेदन करणारें पत्र संस्थानाकडे पाठविलें आहे. ते त्या पत्रांत लिहितातः—

"ता. १–३–५३ रोजीं भरलेल्या सर्वसामान्य सभेंत कायम फंडांतून रकम काढून भक्तांसाठीं इमारती बांधण्यासाठीं मंजुरी मिळाली नाहीं. दिवसेंदिवस भक्त शिरडीला वाढत्या प्रमाणांत येत आहेत. जागृत स्थान आहे. मे महिन्यांच्या सुटीच्या दिवसांचा फायदा घेऊन शिरडीस येणाऱ्या भक्तांची संख्या अधिकाधिक वाढत आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन नव्या इमारती बांधणें वस्तुतः अत्यंत अगत्याचें आहे. कायम निधि याचा अर्थ ज्या निधीला कधींहि हात लावायचा नाहीं, असा नसून अपरिहार्य आणि निरतिशय आवश्यक बाबीसाठींच तो खर्च व्हावा असाच धरला पाहिजे. या निधीला केव्हांच हात लावायचा नाहीं, भक्तांच्या सोयीसाठीं देखील त्यांतील कपर्दिकाहि खर्च करायची नाहीं असें ठरविल्यास तो निधि नुसता फुगत कशासाठीं ठेवायचा? संस्थानकडे येणारी सर्वच रकम या कायम निधींत जमा करण्यांत आली आहे. १९४० सालीं कायम निधि साठ हजार रुपये होता तो १९५२ सालांत तीन लाखांवर गेला. गेल्या ३।४ वर्षांत बऱ्याच सोयी केल्या आहेत त्यामुळें साधारण नवीन भक्तांची सोय उत्तम होत असल्याची पत्रें येत असूनही रहाण्याची गैर सोईची जाणीव नमूद केली जाते. भक्तांच्या अत्यावश्यक गरजेसाठीं यांतील पैशाचा विनियोग करायचा नाहीं तर त्याचें दुसरें प्रयोजन तरी काय? पण सर्वसामान्य सभेनें प्रतिकूल निर्णय दिल्यामुळें भक्तांच्या सोयी करतां येत नाहींत आणि त्यांच्याकडून संस्थानला व कमिटीला निष्कारण दूषण मात्र मिळतें. या सर्व गोष्टींचा विचार करून भक्तसदस्यांनीं आपला निर्णय येत्या सर्व साधारण सभेंत द्यावा यासाठीं हा पत्राचा प्रपंच केला आहे."

आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला ।
यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत् ॥

अर्थः—माणसामध्यें 'आशा' नांवाची एक विलक्षण बेडी आहे. ही बेडी ज्यांच्या पायांत पडते ते पळत सुटतात आणि ज्यांच्या पायांत ही बेडी नाहीं ते पांगळ्यासारखे होऊन राहातात!

—सुभाषित

दुर्जन आणि सज्जन या दोघांनाहि मी प्रणाम करतों. पण हाय! दोघेहि मला सारख्याच यातना देतात. दुर्जन माझ्या संगतींत आल्याबरोबर मला यातना देऊं लागतात; तर सज्जन माझी संगत सोडून जाऊं लागले म्हणजे मला प्राणांतिक वेदना होतात.

—संत तुलसीदास

# श्रीसाई शिवमंदिराचा स्थापनोत्सव

चिंचणी येथील श्रीसाई शिवमंदिराचा स्थापनोत्सव दि० १९ व २० मे रोजीं थाटानें साजरा झाला. आदले दिवशीं म्हणजे सोमवार ता. १८ ला विश्वस्त श्रीपाद बा. देव,यांचें मंदिरांत रात्रीं ९॥ वाजतां कीर्तन झालें. नानासाहेब चांदोरकरांचें आख्यान कीर्तनांत लावलें होतें. मंगळवारीं ह. भ. प. पिळुबुवा वडूजकर यांचें कीर्तन झालें. बुधवारीं लघुरुद्र, महाप्रसाद व कीर्तन असा कार्यक्रम झाला. प्रत्येक कार्यक्रमाला खूप गर्दी जमत असे. उत्सवाला विश्वस्त आणि इतर भक्त यांनीं अत्यंत उत्साहानें सर्वतोपरि साहाय्य केल्यामुळें उत्सव मोठ्या यशस्वीपणें पार पडला.

—×—

## वाचकांच्या माहितीसाठीं :—

श्रीसाईलीलेच्या गेल्या रामनवमी विशेषांकांत 'रंगू आत्माराम चाळकर' या लेखिकेचा 'साईबाबांचें भक्तप्रेम' हा लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखांत श्रीसाईबाबा आपल्या घरीं आले होते व त्यांचीं दोन पावलें आपल्या घरांत उमटलेलीं आहेत; अशी माहिती होती. त्या लेखिकेच्या घरचा पत्ता विचारणारीं अनेक पत्रें आमच्याकडे आलीं आहेत, तो पत्ता पुढीलप्रमाणें आहे :—

रंगू आत्माराम चाळकर,<br>
चाळकरांचा बंगला,<br>
दहिसर, पोस्ट बोरिवली.

—×—

## आभार :—

श्री. व्यंकटेश मधुसूदन कांबळी यांनीं श्रीसाईबाबांचा रंगीत चित्राचा ब्लॉक विनामूल्य दिला. तो या अंकांत छापला आहे. श्री. कांबळी यांचें आम्ही आभारी आहोंत.

—संपादक

दादर भागांत
फॅशनेबल व टिकाऊ
शिलाईचे कपडे व्यवस्थित
व किफायतशीर दरानें शिवून मिळण्याचें
: प्रख्यात ठिकाण :
— रावल टेलरिंग फर्म —
मोहमद बिल्डिंग चित्रा सिनेमाजवळ, व्हिन्सेंट रोड दादर, मुंबई १४
RAWAL TAILORING FIRM
TAILORS & OUTFITTERS
Mohamad Building (Near Chitra Cinema)
Vincent Road, Dadar, Bombay 14.
A TRIAL ORDER WILL SATISFY YOU
FOR BEST STYLES
AT MODERATE RATES
MADE WELL
WEAR WELL

## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक (इंग्रजी) | | ,, ,, | १–०–० |

वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान,
२५, बँक स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.